दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ६१ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.२६ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# वीज दर २-३ वर्षांत कमी करू:मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला विश्वास

## आवास योजनेंतर्गत सोलार देण्याचा प्रयत्न;नदीजोड प्रकल्पामुळे राज्याचे चित्र बदलेल

**नागपूर (वृत्तसंस्था)**–पुढील २-३ वर्षांत उद्योग, गृह यांसारख्या सर्वच क्षेत्रातील वीजेचे दर आपण कमी करणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अशा प्रकारचे नियोजन ऊर्जा विभागात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आवास योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या घरांमध्ये सोलार देण्याचा प्रयत्न असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सरकारच्या विविध योजनांची तसेच सरकारचे पुढील प्लॅन काय असणार याबाबत माहिती दिली.विधानसभा निवडणुकीत पत्रकारांचे सहकार्य मोठ्या प्रमाणात लाभले. लोकसभा निवडणुकीवेळी महाराष्ट्रात फेक नरेटीव्ह तयार करण्यात आला होता. त्या फेक नरेटीव्हचा मोठा फटका आम्हाला बसला. विधानसभा निवडणुकीत तो फेक नरेटीव्ह तोडू शकलो आणि थेट जनतेपर्यंत पोहचू शकलो. त्यामुळे महाराष्ट्राच्या आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वांत मोठा विजय २३७ जागा महायुतीला प्राप्त झाल्या. भाजपला राजकीय जीवनातील उच्चांक १३२ जागा मिळाल्या. एवढे मोठे बहुमत मिळाल्यामुळे आमची जबाबदारी देखील वाढली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

कोणतेही बहुमत जनतेच्या अपेक्षा घेऊन येत असते. आव्हाने, अपेक्षा, अडचणी आणि मर्यादा असतात. परंतु या अडचणी आणि मर्यादांवर मात करून जनतेच्या मनातील कामे झाली पाहिजे. तशा प्रकारचा महाराष्ट्र तयार झाला पाहिजे, हा प्रयत्न करायचा आहे. २०१४ साली मुख्यमंत्री झाल्यानंतर अनेक लोकांच्या मनात अनेक शंका होत्या. काही लोकांना वाटायचे की, हा मंत्री पण राहिलेला नाही. मुख्यमंत्री म्हणून कसा काम करेल, काही लोकांना वाटायचे नवख्या व्यक्तीकडे काम आलेले आहे. परंतु माझ्या पहिल्या पाच वर्षांच्या कामात विदर्भाचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला.



सोबतच महाराष्ट्रातील कोणत्याच भागावर अन्याय होऊ दिला नाही, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.विदर्भामध्ये सिंचनाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात केले. ८० प्रकल्प पूर्ण केले असून अनेक प्रकल्प पूर्णत्वापर्यंत आणले. त्याचबरोबर वर्षानुवर्ष रखडलेले पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह कोकणातील प्रकल्प पूर्ण केले. सर्वच क्षेत्रात मोठी भरारी त्या पाच वर्षांत घेतली. त्यानंतर गेल्या अडीच वर्षांत उपमुख्यमंत्री पदाची संधी भेटल्यानंतर ऊर्जा, सिंचन, गृहनिर्माण, गृहमंत्री अशा अनेक खात्यांचे काम केले. ऊर्जा विभागाचा पुढील २५ वर्षांचा रोड मॅप आपण तयार केला आहे. पुढील २-३ वर्षात सर्वच प्रकारचे वीजेचे दर आपण कमी करू शकतो, अशा प्रकारची व्यवस्था ऊर्जा विभागात उभी केली असल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. ६ नदीजोड प्रकल्पाची कामे आपण हातामध्ये घेतलेली आहे. ही कामे महाराष्ट्राचे चित्र बदलणारी आहे. विदर्भातील नदीजोड प्रकल्पामुळे १० लाख एकर आणि ७ जिल्ह्यांचे चित्र बदलू शकेल, असे प्रकल्प हातात घेतले आहेत, अशी माहिती देखील त्यांनी दिली.

### आवाज योजनांमधील घरांना सोलार देणार


**केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्राला गतीने पुढे नेण्याचा प्रयत्न आहे. परवाच शिवराजसिंग चौहान यांनी एकाच वर्षात पंतप्रधान आवास योजनेच्या अंतर्गत २० लाख घरे दिली आहे. हा देशातील विक्रम आहे. अनेक राज्यांना १० वर्षात देखील २० लाख घरे मिळाली नाहीत. २०२२ मध्ये एसीसीच्या यादीप्रमाणे लक्ष्य ठेवले होते. ते पूर्ण केले. आवास योजनांअंतर्गत जी घरे बांधली जातील, त्या घरांमध्ये सोलार देण्याचा आमचा प्रयत्न आहे. जेणेकरून त्या लाभार्थ्यांना मोफत वीज मिळावी असा आमचा प्रयत्न असल्याचे देवेंद्र फडणवीसा यांनी सांगितले.**

---

### पक्ष प्रदेशाध्यक्ष बदलणे,न बदलणे हा केंद्राचा विषय

# दर तीन वर्षांनी आमची कार्यकारणी बदलत असते-चंद्रकांत पाटील

**पुणे (वृत्तसंस्था)**–नुकतेच राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर आता भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या बदलीबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.भाजप प्रदेशाध्यक्ष पदाच्या बदलाबाबत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते मंत्री चंद्रकांत पाटील यांना पत्रकारांनी विचारणा केली असता ते म्हणाले की , पक्ष प्रदेशाध्यक्ष बदलणे, न बदलणे हा केंद्राचा विषय आहे.पण साधारणतः दर तीन वर्षांनी आमची सगळी कार्यकारणी ही बदलत असते आणि ही लोकशाही प्रक्रिया आता आमच्याकडे सुरू आहे. पक्ष सदस्यता मग, सक्रिय सदस्यता आणि लोकशाही मार्गाने सर्व स्तरावर निवडणुका होत होत ही प्रक्रिया चालत असते असे यावेळी पाटील म्हणाले.



राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी बुधवारी सुशासन दिनानिमित्त सिव्हिल कोर्ट ते मंडई मेट्रो स्टेशन असा मेट्रो प्रवास केला.यावेळी त्यांनी मेट्रो अधिकाऱ्यांचा सन्मान केला आणि त्यानंतर मंडई येथे मेट्रो स्टेशन गेट दोनची पाहणी केली.यावेळी त्यांना याबाबत विचारलं असता त्यांनी आपलं मत व्यक्त केले.यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांना पुणे शहरात दोन महापालिकेच्या प्रस्तावाच्या बाबत विचारलं असता ते म्हणाले की ,याच अंतिम निर्णय हा शेवटी राज्याचे मुख्यमंत्री हे करणार आहे.देवेंद्र फडणवीस यांना पुणे शहराच्या सर्वच प्रश्न माहीत आहे.पण आम्ही १५ जानेवारीला पुण्याच्या प्रश्नांच्या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांची भेट मागत आहोत आणि याच्या एका आठवड्याच्या आधी पुण्याचे प्रश्न त्यांना देणार आहोत.३४ गावांच्या समावेशानंतर पुणे महापालिका ही एशियातील सर्वात मोठी भौगोलिक क्षेत्र असलेली महापालिका झाली आहे.त्यामुळे प्रशासन म्हणून ती चालवणे अवघड आहे. आणि म्हणून दोन महानगरपालिका केले पाहिजे आणि हे आम्ही मुख्यमंत्री यांच्या समोर मांडणार आहोत असे यावेळी पाटील म्हणाले.यावेळी पाटील यांना पुरंदर विमानतळ येथील प्रश्नाच्या बाबत विचारलं असता ते म्हणाले की, पुरंदर विमानतळाच परवानग्या सगळ्या झाल्या असून जमीन भूसंपादन बाबत गती पकडावी लागणार आहे आणि याला २ ते ३ वर्ष हे लागणार आहे.पुण्याचे पालकमंत्री पदाच्या बाबत पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले की, या विषयात राज्याचे मुख्यमंत्री निर्णय करतात.तसेच त्यांचे सहकारी एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तिघे मिळून निर्णय करतील.तसेच आमच्या पालकमंत्री पदाच्या बाबत कोणताही फॉर्म्युला नसून समन्वय हा आमचा फॉर्म्युला असल्याचं यावेळी पाटील म्हणाले.

---

### भुजबळ ज्येष्ठ नेते, त्यांच्याशी आमचे चांगले संबंध

# सुप्रिया सुळे यांची माहिती;भुजबळ कुटुंबीयांनी संघर्षाच्या काळात खूप भोगल्याचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे नाराज असणाऱ्या छगन भुजबळ यांच्याशी आपले कौटुंबिक संबंध असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी केला. छगन भुजबळ हे राज्यातील एक ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्याशी आमचे राजकीय मतभेद असले तरी, आमच्यात चांगले कौटुंबिक संबंध आहेत, असे त्या म्हणाल्यात.

राज्य मंत्रिमंडळाचा १५ डिसेंबर रोजी विस्तार झाला. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना स्थान मिळाले नाही. यामुळे भुजबळ अजित पवारांवर प्रचंड नाराज झालेत. या प्रकरणी त्यांनी अजित पवारांसह सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांच्यावर जाहीरपणे टीका केली. तसेच 'जहां नहीं चैना वहां नही रहना' असे म्हणत एकप्रकारे त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देण्याचेच संकेत दिलेत. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी भुजबळ कुटुंबीयांशी आपले चांगले संबंध असल्याचा दावा करत एकप्रकारे त्यांना आपल्या पक्षात येण्याचे निमंत्रण दिले आहे.सुप्रिया सुळे बुधवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, छगन भुजबळ राज्यातील एक ज्येष्ठ नेते आहेत. मधल्या काळात आमचे त्यांच्याशी राजकीय मतभेद झाले. पण त्यानंतरही आमच्यातील कौटुंबिक संबंध चांगलेच आहे. मी राजकीय संबंधांना कौटुंबिक संबंधांच्या आड येऊ देत नाही. मी भुजबळच नव्हे तर कुणासोबतचे कौटुंबिक संबंध तोडत नाही. भुजबळांच्या संघर्षाच्या काळात त्यांची मुले, लेकी, सुना, नातवंडांचे दुःख मी जवळून पाहिले आहे. आपण सर्वांनी मिळून त्यांना कितीही साथ दिली, त्या अडचणीच्या काळात त्या कुटुंबाने जे भोगले आहे ते फार वेदना देणारेच आहे.विशेष म्हणजे छगन भुजबळ यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली होती. या दोन्ही नेत्यांत जवळपास अर्धा तास चर्चा झाली. या चर्चेचा तपशील बाहेर आला नाही. पण उभयंतांत भुजबळांना मंत्रिपद नाकारणे व त्यानंतरच्या त्यांच्या राजकीय वाटचालीवर चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. विशेषतः फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भुजबळांना डावलले नसल्याचा दावा केला होता.

---

# मला मंत्रिपद मिळू नये म्हणून अनेकांनी प्रयत्न केले पण माझे मंत्रिपद देव ठरवतो-केसरकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**– मला मंत्रिपद मिळू नये म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. पण कदाचित मी मंत्रिपदापेक्षाही मोठ्या पदावर जाईन, असे सूचक विधान शिवसेना नेते तथा राज्याचे माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले आहे. राज्य मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही म्हणून मी नाराज नसल्याचेही ते यावेळी म्हणाले.राज्य मंत्रिमंडळाचा गत १५ डिसेंबर रोजी विस्तार झाला. त्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते दीपक केसरकर यांना संधी मिळाली. यामुळे ते नाराज झाल्याची चर्चा होती. पण त्यांनी स्वतःच ही चर्चा फेटाळून लावली आहे. मंत्रिमंडळ नसल्यामुळे मला मोकळा श्वास घेण्याची संधी मिळाली, यामुळे मी आनंदी आहे, असे ते म्हणालेत.दीपक केसरकर सिंधुदुर्गात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, मला मंत्रिपद मिळू नये म्हणून अनेक लोकांनी प्रयत्न केले. मला त्यांची कीव येते. माझे मंत्रिपद देव ठरवत असतो. कदाचित भविष्यात



मी मंत्र्यांपेक्षाही वरच्या पदावर जाईन. मी साईबाबांचा भक्त आहे. मला पद द्यायला साईबाबा समर्थ आहेत. मंत्रिपद नसल्यामुळे आता मला मोकळा श्वास घेण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी आनंदात आहे, असे ते म्हणाले.मला केंद्र व राज्यातील नेत्यांचा पाठिंबा आहे. त्यामुळे काळजी नाही. कोणत्याही मंत्र्याने केली नाहीत एवढी कामे मी माझ्या मंत्रिपदाच्या काळात केली. मराठी भाषा विभाग, मुंबई शहर असेल किंवा शिक्षण विभाग असेल, या विभागात मी मोठी कामे केली. मी माझ्या कामांची एक पुस्तिकाही काढणार आहे. कोणत्याही परिस्थितीत आपली मान अभिमानाने ताठ राहील अशीच मी आतापर्यंत केली असून, भविष्यातही करेन, असेही ते यावेळी म्हणाले.

---

### देवेंद्र फडणवीस गडचिरोलीचे पालकमंत्री व्हावे ही जनतेची इच्छा

# मुख्यमंत्री जेव्हा जिल्ह्याचा पालकमंत्री होतो तेव्हा विकासाला गती मिळते-चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर (वृत्तसंस्था)**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना गडचिरोलीचे पालकमंत्री होण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. यावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. गडचिरोलीमधून अशी मागणी आहे की जिल्ह्याचे पालकत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावे. जेव्हा मुख्यमंत्री एखाद्या जिल्ह्याचे पालकमंत्री होतात, तेव्हा तिथल्या विकासाला गती मिळते. गडचिरोलीमधून तशी मागणी होत आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच गडचिरोलीचे पालकत्व स्वीकारावे.

दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वामित्व योजनेविषयी देखील पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. बावनकुळे म्हणाले, स्वामित्व योजना म्हणजे खरेतर आपण बघितले की आपल्या ग्रामीण महाराष्ट्रात राहणारे लोकांमध्ये जमिनीवरून वादविवाद, प्रॉपर्टीवरून वादविवाद होतात. नागरिकांना त्यांच्या हक्काचे पट्टे नसल्यामुळे, त्याचे प्रॉपर्टी कार्ड नसल्यामुळे त्यांची फसवणूक केली जाते. म्हणून वाडीलोपार्जित जमिनी घरे डिजिटल पद्धतीने त्याचे कार्ड प्रत्येक नगरिकाकडे गावठाणामध्ये असले पाहिजे याचा विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आणि आधुनिक युगात आधुनिक डॉक्युमेंट असले पाहिजे म्हणून मोदींनी ड्रोनद्वारे महाराष्ट्राचे तसेच देशाचे सर्वेक्षण केले. यानुसार महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांमध्ये या कार्यक्रमाची सुरुवात होत आहे. ३०,५१५ गाव या योजनेत डिजिटलाईज होणार आहेत, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.



पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वयंपूर्ण परिवार, स्वयंपूर्ण गावठाण या योजनेविषयी बोलताना म्हणाले, गावपातळीवर नकाशे उपलब्ध करणे, जागाबद्दल, घराबद्दल स्पष्टता येणे, परवानगी देणे या सगळ्या गोष्टी प्रॉपर्टी कार्ड असल्यावर दुसऱ्या कागदपत्रांची गरज नसते. आणि मालमत्ता कर लावण्यापासून ते पुढच्या पिढीला सुद्धा म्हणजे वडिलांकडे डॉक्युमेंट नसतील तर मुलगा डॉक्युमेंट आपल्या नावे कसे करेल, यामुळे मोठे वाद निर्माण होत होते. यामुळे आता या योजनेतून मोठा फायदा ग्रामीण भागातील लोकांना होणार आहे. या योजनेतून गावकऱ्यांना मालमत्ता पत्र तर मिळणार आहेच, पण गावकऱ्यांची आर्थिक पद सुद्धा वाढणार आहे. एखाद्या शेतकऱ्याकडे त्याच्या नावाने काहीच नसते, या माध्यमातून आता डिजिटल कार्ड मिळणार आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक पत सुद्धा उंच होणार आहे. एखाद्यावेळी काही गृह कर्ज घ्यायचे असेल आणि कर्जासाठी डॉक्युमेंट नाही तर अशा वेळी त्याला गृह कर्जासाठी डॉक्युमेंट मिळेल. अनेक केंद्र व राज्य सरकारच्या योजना घेण्या साठी जे अत्यंत महत्त्वाचे डॉक्युमेंट म्हणजे प्रॉपर्टी डॉक्युमेंट किंवा एखादी योजना आली ती योजना थेट त्याच्या अकाऊंटमध्ये, एखादे जर शेतीचे पैसे आले असतील, पीकनुकसान भरपाईचे पैसे आले असतील तर आपण तिथे आधार लिंक करतो. पण त्याच सोबतच जर प्रॉपर्टी कार्ड असेल तर मोठा फायदा होणार आहे.व्यवसाय करण्यासाठी सुद्धा प्रॉपर्टी कार्डचा फायदा होणार आहे. खरे तर स्वयंपूर्ण परिवार, स्वयंपूर्ण गावठाण निर्माण होणार आहे आणि आदिवासी भागातल्या आणि मागास भागत सुद्धा ९० टक्के घरे असे आहेत की ज्यांच्याकडे कार्डच नाही. त्यामुळे आदिवासी वाड्यात, धनगर वाड्या-पड्यात आणि यातून सर्व रेग्युलराजेशन या योजनेतून होणार असल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

# बाबा आमटे यांच्या विचारांची प्रासंगिकता

**वर्तमानकाळात जातीपातीला प्राधान्य देणारे वातावरण निर्माण झालेले दिसत आहे. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय भावना कागदांत बंदिस्त झाली की काय? असे वातावरण आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष देशाच्या भवितव्याचे पहारेकरी असतीलही पण या पहारेकऱ्यांवरही पहारा ठेवणारे लोक हवे असतात असे बाबा म्हणत असतं. आज देशात नोटांसारखाच आश्वासनांचाही चलन फुगवटा झाला आहे. त्यामुळे बाबा जरी देहाने दूर गेले तरी सर्व जातीपातीच्या भिंती गळून सगळ्यांना राष्ट्रभावनेच्या एका बंधनात आणण्यासाठी बाबांच्या विचारांची प्रेरणा आजही उपयुक्त ठरणार आहे याविषयी दुमत नाही.**





**पब्लिक टॅग**

**डॉ.यशवंत घुमे**

**मो.९८२२२३३९१२**

बाबांमध्ये विश्वमित्रासारखी जिद्द आणि नवनिर्माणाची कुवत होती. सत्प्रवृत्तींचा तजेला टवटवीत ठेवायला, फोफवायला सतकृतींचे सदाबहार खतपाणी आवश्यक असते. बाबांना ते आई लक्ष्मीबाईंच्या बालपणीच्या संस्कारातून मिळाले. येशू ख्रिस्त, राष्ट्रपिता महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, परमपूज्य साने गुरुजी, कविवर्य रवींद्रनाथ टागोर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन बाबांनी कृतिशील समाजकार्य सुरू केले. या महामानवांच्या वैचारिक प्रभावाने कृतिशील आयुष्य जगणाऱ्या बाबांच्या हातून चिरंतन टिकणारे कार्य घडत गेले. गावकुसाबाहेरील माणसांच्या प्रश्नांसाठी म्हणजेच कुष्ठरोग्यांच्या रोगमुक्ती आणि पुनर्वसनासाठी त्यांनी जातपात, धर्म, प्रांत असा कोणताही भेदभाव न करता आयुष्यभर मानवधर्माचे आचरण केले. एकदा समाजकार्याची लगन लागली की एका समग्र रचनेत बसणाऱ्या शेकडो प्रवृत्ती सुरू करण्याची उपक्रमशीलता संचालकात येते, तशी बाबांमध्ये आली. स्वतः कुष्ठरोग्यांसोबत राहून कुष्ठरोग्यांची सेवा केली. कुष्ठरोग संसर्गजन्य नाही हे जगाला बाबांनी स्वकर्तृत्वाने पटवून दिले. त्यांच्या या कार्यात बाबांच्या पत्नी साधनाताई यांनीही अपार कष्ट घेत मोलाची साथ दिली. कुष्ठपिडीतांच्या जीवनातील सगळी कुरूपता नष्ट करण्यासाठी काही समविचारी लोकांना सोबत घेऊन उभयतांनी वरोरा येथे २१ जुन,१९५१ रोजी महारोगी सेवा समितीची स्थापन केली. या समितीच्या माध्यमातून समाजातील दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी हा महात्मा अविरत अखंडपणे धावतच राहिला. थांबणे त्यांच्या कर्तुत्वाला मान्य नव्हते. त्यांनी भान राखून योजना आखल्या आणि बेभान होऊन त्या राबवल्या. शरीरात प्राण असेपर्यंत कार्यरत राहायचा ध्यास बाबांनी घेतला होता.

बाबा आमटे पुरोगामी विचारांचे होते. संत ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचे तर हे विश्वची माझे घर या संतपदाला बाबा पोहोचलेले होते. जातपात, धर्म, देश, भाषा, प्रांतभेद या सीमांचे बंधन त्यांनी तोडले होते. आनंदवनात फक्त माणूसच राहतो. मानवता हीच त्याची ओळख. व्यक्तीच्या गुणांना अधिकाधिक उजाळा मिळत गेला की तिचे दोष आपोआपच मागे हटत जातात. अत्यंत साधी राहणी व उच्च विचारसरणी असे बाबांचे व्यक्तिमत्व होते. बाबांना कर्मकांड मान्य नव्हते. विज्ञानविषयक विचारांना त्यांचे प्राधान्य होते. उपास-तापास, नवस- सायास या गोष्टी त्यांना पटत नव्हत्या. माणूस जिवंत आहे तोपर्यंत त्याच्या देहाला महत्त्व आहे. म्हणून मृत शरीरासाठी विधी करण्याची आवश्यकता नाही. माणूस जिवंत असताना त्याची जमेल तेवढी सेवा केली पाहिजे हे माणूस घडविणारे तत्वज्ञान बाबा मांडत असत. मृत्यूमुळे आपली आवडती व्यक्ती आपल्या नजरेआड होते पण आपल्यापासून दुरावत नाही असे त्यांचे मत होते.

राष्ट्रभक्ती बाबांच्या रोमारोमात होती. म्हणून जेव्हा जेव्हा देश संकटात आहे याची बाबांना जाणीव होत, तेव्हा तनमन अर्पून ते देशकार्यातही धावून गेले. १९८४ मध्ये भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिराजी गांधी यांची त्यांच्या अंगरक्षकांकडून अमानुषपणे हत्या झाली. त्याचे पडसाद संपूर्ण देशभर पसरले. दंगल, जाळपोळ, मारामाऱ्या, सामाजिक गोंधळ यामुळे सारे वातावरण ढवळून दूषित झाले होते. देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होतो की काय? असे तंग वातावरण निर्माण झालेले होते. देशात एकप्रकारे सामाजिक दुही माजली होती. सारा देश अमानवीय वणव्यात होरपळत असताना मानवतावादी आणि शांततेचा पुरस्कार करणाऱ्या बाबांसमोर चिंता निर्माण झाली. बाबा विचलित झाले. दुभंगलेली मने जोडली पाहिजेत हा विचार त्यांच्या मनात जागा झाला. संपूर्ण भारतवासीयांत बंधुभाव प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. मानवी प्रेमाची साखळी निर्माण करण्यासाठी भारत जोडो अभियानाचा संकल्प सोडला. २४ डिसेंबर, १९८५ ला सानेगुरुजींच्या वाढदिवशी भारत जोडो ला सुरुवात झाली. कन्याकुमारी येथून भारत जोडो अभियानाची सुरुवात झाली. एकूण १०७ दिवसांचे हे अभियान होते. या अभियानात

**मंदिर मस्जिद गिरिजाघर ने**
**बाट लिया भगवान को**
**धरती बॉटी सागर बॉटा**
**मत बॉटो इन्सान को**

**जाती जाती की बात छोडो,**
**भारत जोडो, भारत जोडो**
**आओ सब मिलकर बोलो,**
**जोडो भारत, भारत जोडो**

**हम युवाओंका एक ही नारा**
**बटेना भारत, कभी हमारा**

अशा नाऱ्यांनी सारा आसमंत दणाणून जात असे. या गीतांनी व घोषणांनी देशात एकप्रकारे नवचैतन्य निर्माण केल. संपूर्ण देशाचे लक्ष या यात्रेने वेधून घेतले होते. चौदा राज्यांतून ५०४२ किलोमीटरचा प्रवास करीत या अभियानाने भारतीयांच्या मनात प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.सर्व राज्यातील लोकांनी अतिशय मनापासून स्वागत केले. देशासाठी मरावे कसे? हे सगळे सांगतात. पण देशासाठी जगावे कसे? हे मात्र कोणीच सांगत नाही. ते बाबांनी सांगितले.

बाबांची स्वतःची प्रकृती ठीक नसल्याने डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला. पाठीच्या दुखण्याचा त्रास वाढलेला होता. त्यांना नीट बसताही येत नव्हते. केवळ बिछान्यावर झोपून राहणे किंवा उभे राहणे हे दोनच पर्याय त्याच्यासमोर होते. त्यामुळे सारा प्रवास त्याना झोपूनच करावा लागत असे. तरीही बाबांनी भारत जोडणाऱ्या या यात्रेचे नेतृत्व खंबीरपणे केले. देशभराच्या विविध भागांतून आलेल्या विविध प्रदेशांतील अनेक जातीधर्माच्या १२५ सायकलस्वारांच्या सोबत कन्याकुमारी ते कश्मीर हे भारत जोडो अभियान राबविले. सोबतच यात्रेमध्ये वृक्षारोपण, पथनाट्ये, कथाकथनाद्वारे त्यांनी भारतीयांचे लोकप्रबोधन केले जात. देशवासीयांत शांततेचा व समतेचा संदेश देत भाषणांतून राष्ट्रीय एकात्मतेची गरज प्रतिपादन केली जायची. यामुळे तत्कालीन युवकांमधील द्वेषाची भावना कमी करण्यात निश्चितच उपयोग झाला. विविध भाषा बोलणार्या लोकांसोबत संवाद साधत भारत जोडो यात्रेचा पहिला टप्पा १० एप्रिल, १९८६ रोजी जम्मू येथे समाप्त झाला. पहिले मिशन यशस्वी झाल्यानंतर बाबांनी १ नोव्हेंबर, १९८७ ते २६ मार्च, १९८८ या कालावधीत भारत जोडो अभियानाचा दुसरा टप्पा ठरवला. १४६ दिवसांच्या या कालावधीत एकूण ७५४६ किलोमीटरचे अंतर प्रवास केला. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार देणारे बाबांचे जोडो भारत अभियान सामाजिक सलोखा निर्माण करण्यात यशस्वी झाले. विशाल पसरलेल्या भारतीय उपखंडाला एकत्र आणणारी ही भारत जोडो यात्रा तत्कालीन परिस्थितीत युवकांसाठी दीपस्तंभ ठरली. देशाच्या नवनिर्माणासाठी मी भारत जोडो यात्रा सुरू केली आहे. युवा चेतना जागवणे, युवा कंपनी निर्माण करणे यासाठी ही धडपड असल्याचे मत बाबांनी व्यक्त केले. मातेवर प्रेम कराच पण त्याहीपेक्षा अधिक प्रेम आपल्या मातीवर करा असे विचार ते वाटत.

समाजासमाजांमध्ये, धर्माधर्मांमध्ये, जातीजातींमध्ये फूट पाडण्याचे षडयंत्र राजकीय नेते करीत आहेत. कारण त्या आधारावरच ही मंडळी निवडून येतात. अशा असंख्य प्रश्नांची जाण व समज वाढविण्याचे कार्य त्याकाळी भारत जोडो अभियानाने केले. हे प्रश्न मोठ्या प्रमाणात जिवंत असल्याने देशाप्रति आयुष्य समर्पित करण्यासाठी, युवकांच्या मनात देशभक्ती जागविण्यासाठी बाबा आमटे यांच्या विचारांची आजही गरज आहे. तरुणांना घडविण्याचे कार्य त्यावेळी भारत जोडो अभियानाने केले, देशातील अलीकडील वातावरण बघता बाबांच्या विचाराची आजही आवश्यकता आहे असे वाटते. तरूणांसाठी बाबांचे दुसरे उल्लेखनीय कार्य म्हणजे मूल जवळील सोमनाथ येथील श्रमसंस्कार छावणी होय. तरुण पिढीची वाया जाणारी काही शक्ती विधायक कार्याला लागावी या हेतूने बाबांनी युवकांसाठी वर्कर्स युनिव्हर्सिटी ची स्थापना केली. युवकांना माणूस घडविणारे अभियान म्हणून या प्रयोगाकडे पाहावे लागेल.१९६८ पासून सोमनाथच्या जंगल परिसरात वर्कर्स युनिव्हर्सिटीचे कार्य सुरू झाले.तरुणांमध्ये नकारात्मकतेची भावना मोठ्या प्रमाणात दिसून आल्याने दूर करण्यात सोमनाथ येथील श्रमसंस्कार छावणीने महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. श्रमसंस्कार छावणीच्या आयोजनाने तरुणांमध्ये देशप्रेमाची भावना निर्माण होऊन सकारात्मकता पसरली. त्यामुळे श्रमसंस्कार छावणी म्हणजे युवकांमध्ये देशप्रेमाची पेरणी करणारे केंद्र ठरले.चैतन्यमय माणसे घडविण्यासाठी बाबांचा हा उद्योग होता. नवनिर्मितीच्या धुंदीने वेडे केलेल्या बाबांना तरुण पिढीचा एक सैनिक व्हायचे होते. या शिबिरातून आजवर लाखो युवक युवती सुसंस्कारित झाले आहेत. देशाला थरथर कापणारी भेकड नवी पिढी नको आहे तर उत्साहाने भरलेली आणि समर्पित भावनेने ओथंबलेली अशी तरुणाई पाहिजे आहे असे बाबांना वाटत. बाबांच्या कामांतून प्रेरणा घेऊन अनेक युवक समाजसेवेत सक्रीय आहेत. आपापल्या क्षेत्रात नावलौकिक मिळवीत आहेत.

आनंदवन असो, हेमलकसा असो की, सोमनाथ येथील लोकबिरादरी प्रकल्प असो. महारोगी सेवा समितीच्या अंतर्गत संचलीत विविध प्रकारच्या जवळजवळ २८ विविध उपक्रमांतून बाबांचे पुत्र डॉ.विकास आमटे, डॉ.प्रकाश आमटे आणि आता तिसऱ्या पिढीचे विधायक कार्य तरूणाईला आजही कार्यप्रवण करीत आहेत.मानवतेचे पुजारी असलेल्या अशा या महामानवाचे ९ फेब्रुवारी, २००८ रोजी पहाटे ४.१५ वाजता आनंदवन येथे वयाच्या ९४ व्या वर्षी महापरिनिर्वाण झाले.श्वासाच्या अखेरीपर्यंत हा महात्मा सतत अखंडपणे चालतच राहिला.थांबणे त्यांना माहीतच नव्हते. आज बाबा हयात नाहीत. परंतु त्यांचे विचार तरूणाईला आजही प्रेरणादायी आहेत. स्वातंत्र्याच्या ७ दशकांनंतरही तरूणाई समोर येणाऱ्या अनेक समस्या जैसे थे आहेत. वर्तमानकाळात जातीपातीला प्राधान्य देणारे वातावरण निर्माण झालेले दिसत आहे. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय भावना कागदांत बंदिस्त झाली की काय? असे वातावरण आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष देशाच्या भवितव्याचे पहारेकरी असतीलही पण या पहारेकऱ्यांवरही पहारा ठेवणारे लोक हवे असतात असे बाबा म्हणत असतं. आज देशात नोटांसारखाच आश्वासनांचाही चलन फुगवटा झाला आहे. त्यामुळे बाबा जरी देहाने दूर गेले तरी सर्व जातीपातीच्या भिंती गळून सगळ्यांना राष्ट्रभावनेच्या एका बंधनात आणण्यासाठी बाबांच्या विचारांची प्रेरणा आजही उपयुक्त ठरणार आहे याविषयी दुमत नाही.

# महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्ह्याच्या वतीने भाव फलक प्रकाशित

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्ह्याच्या वतीने सलून व्यवसायिकांसाठी नवीन भाव फलक प्रकाशित करण्यात आले. बीड जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.**




भाव फलकाच्या प्रकाशन प्रसंगी जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांनी सर्व सलून व्यवसायिकांना आवाहन केले की,प्रत्येकाने या भाव फलकानुसारच दर आकारावेत. या माध्यमातून व्यवसायाला आर्थिक स्थैर्य मिळवून कुटुंबाच्या प्रगतीसाठी तसेच मुलांच्या शिक्षणासाठी उपयोग होईल. या भाव फलकामुळे एक जानेवारीपासून कटिंग आणि दाढी यांसारख्या सेवा महागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाव फलकाचे वितरण व्यवसायिकांना त्यांच्या सलूनमध्ये लावण्यासाठी करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे, संतोष काशीद, नागेश टाकळकर, गोविंद टाकळकर, बापू झांबरे, शहराध्यक्ष अक्षय जाधव, उपाध्यक्ष अक्षय वाघमारे, सुरेश झेंडे, अशोक राऊत, कार्तिक शेळके, दिनकर सरडे, किशोर वखरे, पोपट झेंडे, प्रकाश वैद्य आदी समाज बांधव उपस्थित होते.

**या उपक्रमातून नाभिक समाजाच्या व्यवसायिकांमध्ये एकजूट निर्माण होण्यासह त्यांच्या व्यवसायाला योग्य दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

# सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील काही भागात वादळीवाऱ्यासह पावसाची शक्यता

**मोहोळ । प्रतिनिधी**

महिन्याच्या सुरुवातीला तीव्र थंडीने हुडहुडी वाढल्यानंतर आता अखेरच्या टप्प्यात वादळी पाऊस आणि गारपिटीचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. उद्यापासून (ता. २६) उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी पावसाचा, तसेच तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) देण्यात आला आहे.



पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात उत्तर तमिळनाडू, दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यालगत ठळक कमी दाब क्षेत्र सक्रिय आहे. पश्चिमेकडे सरकत असलेली ही प्रणाली हळूहळू निवळण्याची शक्यता आहे. पश्चिमी चक्रावात, राजस्थान आणि परिसरावर असलेले चक्राकार वारे, तसेच अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातून होणारा बाष्पाचा पुरवठा यामुळे महाराष्ट्रासह उत्तर भारतात पावसाला पोषक हवामान होत आहे.

देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा कडाका कमी - अधिक होत आहे. सोमवारी (ता. २३) पंजाबच्या 'पतियाळा' येथे देशाच्या सपाट भूभागावरील नीचांकी ६.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पावसाला पोषक हवामान झाल्याने राज्यात ढगाळ हवामान झाले असून, थंडी गायब होत उकाडा वाढला आहे. मंगळवारी (ता. २४) धुळे येथील कृषी महाविद्यालयात राज्याचे नीचांकी १३ अंश तापमान नोंदले गेले.

राज्यात किमान तापमानाचा पारा १३ अंशांच्या पुढे गेला आहे, राज्यात ढगाळ हवामान होत असून, पहाटेच्या वेळी धुक्याची चादर आणि दव पडल्याचे चित्र कायम आहे. आज (ता. २५) राज्यात ढगाळ हवामानाची शक्यता आहे. तर उद्यापासून (ता. २६) शनिवारी (ता. २८) मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात जोरदार वारे, वादळी पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे.

( या भागात पावसाची शक्यता ? )

२६ डिसेंबर-सोलापुर,सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात पावसाची शक्यता

२७ डिसेंबर-मध्य महाराष्ट्र, खानदेश, उत्तर मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील काही भागांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस

२८ डिसेंबर-मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात गारपिटीसह जोरदार पाऊस

# घुग्घुस शहरात भव्य नागरी सत्कार समारंभ

**घुग्घुस । प्रतिनिधी**

शहरात नागरी सत्कार समिती व समस्त शहरवासीयांतर्फे शनिवार २८ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता प्रमोद महाजन रंगमंच, आठवडी बाजार घुग्घुस येथे भव्य नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.



सत्कारमुर्ती म्हणून बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार तथा माजी मंत्री वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय सुधीरभाऊ मुनगंटीवार, चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोरभाऊ जोरगेवार, राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवरावदादा भोंगळे उपस्थित राहणार आहे.

आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार, आमदार किशोरभाऊ जोरगेवार आणि घुग्घुस ही ज्यांची जन्मभूमी व कर्मभूमी राहिली आहे असे घुग्घुस शहराचे भूमिपुत्र, घुग्घुस शहराचा चेहरा मोहरा बदलणारे, विकासपुरुष आमदार देवरावदादा भोंगळे यांचा विधानसभा निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने विजय झाल्याबद्दल तसेच देवरावदादांची जन्मभूमी घुग्घुस शहरात प्रथम आगमनानिमित्त भव्य नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य दिव्य अशा ऐतिहासिक कार्यक्रमास समस्त घुग्घुसकर नागरीकांनी, सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच कार्यकर्ते, हितचिंतक आणि मित्रपरिवाराने मोठया संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पेसा ग्रामसभा समृद्ध व्हावी-विकास राचेलवार

**कोरपना । प्रतिनिधी**

पेसा कायदा हा आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या विकासासाठी प्रभावी माध्यम आहे. ग्रामसभा सक्षम झाली तर गावाचा सर्वांगीण विकास साधता येईल. पेसा कायद्याचे महत्व स्पष्ट करताना ग्रामसभेला सबळ करण्याचे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूरचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार केले. कोरपना तालुक्यातील जिल्हा स्मार्ट ग्राम, बिबी येथे पेसा दिनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. विशेष अतिथी म्हणून पंचायत समिती कोरपनाचे गटविकास अधिकारी विजय पेंदाम, कार्यक्रमाच्या अध्यक्ष सरपंच माधुरी टेकाम, प्रमुख अतिथी उपसरपंच आशिष देरकर, अल्ट्राटेक सिमेंट वेल्फेअर फाउंडेशनचे व्यवस्थापक प्रतीक वानखेडे, बिबीचे पोलीस पाटील राहुल आसुटकर, आसनचे पोलीस पाटील प्रवीण आडे, पेसा जिल्हा व्यवस्थापक मनीष




गणवीर, तालुका व्यवस्थापक पंकज साखरकर, विस्तार अधिकारी पंढरीनाथ गेडाम, प्रशांत दुर्योधन, ग्रामपंचायत अधिकारी धनराज डुकरे, मुख्याध्यापक अनंत रासेकर, उन्मेदचे तालुका व्यवस्थापक भगत यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते. प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी ग्रामस्थांना पेसा कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रास्ताविकातून उपसरपंच आशिष देरकर यांनी ठक्कर बाप्पा आदिवासी उपयोजना शबरी आदिवासी घरकुल योजना तसेच वैयक्तिक लाभांच्या योजना मंजूर करण्याची मागणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी राचेलवार यांच्याकडे केली. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# अवैध रेती उत्खनन प्रकरणात ३९.३० लाखांचा मुद्देमाल जप्त; वरोरा पोलिसांची धडक कारवाई

## महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे अवैध रेती उत्खनन बळावले

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा पोलिसांनी वर्धा नदीच्या करंजी घाटावर अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीवर मोठी कारवाई केली आहे. या मोहिमेत तब्बल ३९.३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, महसूल विभागाच्या दुर्लक्षावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.
सदर कारवाईत पोलिसांनी विविध ठिकाणांहून ट्रॅक्टर-ट्रॉलीसह रेती जप्त केली. यामध्ये ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ सी.जे.०९१५, ट्रॉली एम.एच.३४-सी.डी.६३०५ - ६,५५,०००/-, ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ बि.आर.४८२४, ट्रॉली एम.एच.३४-बि.वी.९९३८ - ६,५५,०००/-, ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ एल.९९०८, ट्रॉली एम.एच.३४-एल.४४३२ - ६,५५,०००/-, ट्रॅक्टर क्र. एम.एच.२९ बि.वी.४१३०, ट्रॉली एम.एच.३४-सी.डी.१०५८ - ६,५५,०००/-, ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ बि.वी.९११३, ट्रॉली एम.एच.३४-बि.आर.६००५ - ६,५५,०००/-,ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ सी.जि.२९०१, ट्रॉली एम.एच.३४-सी.जि.३०८३ - ६,५५,०००/-या वाहनांचा समावेश असून प्रत्येक वाहनात अंदाजे १ ब्रास रेती (५,०००/-) भरलेली होती. याशिवाय फरार ट्रॅक्टर क्र. एम.एच.२९ ए.बी.१५१५ चा शोध सुरू आहे.
पोलिसांनी साजीद अजित शेख (३०), अमोल गजानन बारस्कर (३५), निलेश अनील मिलमिले (३०), परमेश्वर शामराव भटकर (४६), मोहन केशव कुचनकर (२७), रामदास पांडुरंग गाडगे (५६) त्यांच्यावर भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम



३०३(२), ३(५) व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मेश्राम, शरद भस्मे, सफौ. तीरानकर, रुपेश निमसटकर, विशाल राजुरकर, मनोज ठाकरे, बळीराम जाधव, विठ्ठल काकडे आणि अचीत नांदेकर यांनी मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली.
वर्धा नदीच्या घाटांवर गेल्या अनेक महिन्यांपासून अवैध उत्खनन सुरू असून महसूल विभागाने याकडे डोळेझाक केली आहे. परिणामी, पर्यावरणाचा ऱ्हास तर होत आहेच, शिवाय महसूलही बुडत आहे. पोलिसांनी वेळेत पाऊल उचलल्यामुळे गैरप्रकार थांबले असले तरी महसूल विभागाच्या निष्क्रियतेमुळे या समस्येवर कायमस्वरूपी उपाय होणे आवश्यक आहे.
या कारवाईमुळे पोलिसांनी आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. मात्र, महसूल विभागाने तातडीने लक्ष घालून कठोर कारवाई केल्याशिवाय असे प्रकार थांबणार नाहीत.

# श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी जयंतीनिमित्त राजुरा येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित

**अटलजींच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा विकसित भारतासाठी सदैव मार्गदर्शन करीत राहील. सुशासन दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा आमदार देवराव भोंगळे यांचा संदेश**



**राजुरा । प्रतिनिधी**

भारताचे माजी पंतप्रधान, भारतरत्न श्रद्धेय स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त राजुरा येथील भाजपा विधानसभा जनसंपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आमदार देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
अटलजींच्या दूरदृष्टीने विकसीत भारताच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले. भारतीय लोकशाहीला नवी दिशा देणाऱ्या त्यांच्या विचारांनी आणि कार्यांनी आजही प्रत्येक भारतीयाच्या हृदयात स्थान मिळवले आहे. या कार्यक्रमात आमदार भोंगळे यांनी वाजपेयी यांची जीवनकथा उलगडत त्यांचा सौम्य दृष्टिकोन, प्रभावी नेतृत्व आणि सर्वसमावेशक कार्य यांची महत्ता स्पष्ट केली. याच वेळी गोंडपिपरी तालुकाध्यक्ष दीपक सातपुते यांचा वाढदिवस कार्यालयाच्या वतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी तालुका उपाध्यक्ष सतिश कोमरवेल्लीवार, गडचांदूर शहराध्यक्ष अरुण डोहे, गोंडपिपरी भाजयुमो तालुकाध्यक्ष राकेश पुन यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यालयातील सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पिंपरी दुमाला उपसरपंच पदी खेडकर यांची बिनविरोध निवड

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपरी दुमाला ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निकिता विजय खेडकर यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच महेंद्र डोळस यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. मावळते उपसरपंच शरद खळदकर यांच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त झाले होते. एकच अर्ज आल्याने निकिता खेडकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य माणिक म्हाळसकर, जयश्री सोनवणे, तेजश्री चिखले, तसेच ग्रामविकास अधिकारी विशाल ढसाळ उपस्थित होते.
कार्यक्रमास पो. पाटील संतोष जाधव, सोमेश्वर देवस्थानचे अध्यक्ष सुनील सोनवणे, खजिनदार शेखर पाटेकर, कार्याध्यक्ष अभिषेक शेळके, सचिव श्रीकांत सोनवणे, माजी उपसरपंच संदीप सोनवणे, माजी सरपंच मनिषा खेडकर, तसेच उद्योजक,




सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
निकिता खेडकर यांची निवड ग्रामपंचायतीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# परमपूज्य श्री श्री १००८ स्वामी परमानंद गीरीजी महाराज यांचे गोळवाडी नगरीत आगमन

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी गावातील वाकचौरे वस्तीवर स्थित श्री स्वामी जनार्दन स्वामी महाराजांच्या कुटियेत परमपूज्य श्री श्री १००८ स्वामी परमानंद गीरीजी महाराज यांचे प्रवचन संपन्न झाले.
स्वामीजींनी आपल्या प्रवचनात जीवन जगण्याचा संदेश देत सांगितले की, खरा तो एकच धर्म आहे, आणि माणसाने नेहमी सत्य वागावे. वाईट वळणांपासून दूर राहून गोमाता आणि आई-वडिलांची सेवा करावी तसेच धर्मसेवा करावी. या प्रवचनातून स्वामीजींनी पंचक्रोशीतील भक्तांना जीवन मूल्यांचे मार्गदर्शन केले.
प्रवचनानंतर वाकचौरे वस्तीवर महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्वामीजींचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. स्वागतप्रसंगी बाळनाथ वाकचौरे, बाबूलाल मांजरे, भीमराज पगार (सेक्रेटरी), मनोहर वाकचौरे, रामकिसन वाकचौरे आणि गावातील भक्तमंडळी मोठ्या भक्तिभावाने उपस्थित होती. या कार्यक्रमामुळे गोळवाडी नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



# गंगाखेड येथे मनुस्मृतीचे दहन

**गंगाखेड । प्रतिनिधी**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले होते. त्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी २५ डिसेंबर हा दिवस मनुस्मृती दहन दिन म्हणून साजरा केला जातो.
याच परंपरेनुसार, गंगाखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर बुधवार, २५ डिसेंबर रोजी आंबेडकरी अनुयायांच्या वतीने मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांनी



सामाजिक समतेचा संदेश देत बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास महावीर घोबाळे, विकास रोडे, मनोहर वावळे, संतोष हनवते, अशोक वावळे, भीमराव कांबळे, बाळासाहेब जंगले, शिवराज पैठणे, गोविंद नरवड, गुणवंत कांबळे, व्यंकटेश मोरे, वसंत गेजगे, रोहिदास लांडगे, हनुमान भालेकर, नागेश डमरे, नवनाथ साळवे, गजानन पारवे आदी आंबेडकरी अनुयायांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमातून सामाजिक न्याय आणि समतेचा संदेश देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात युवकास २० वर्षे कारावास

**सातारा । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याप्रकरणी संगम संभाजी डुबल (२८, रा. राजमाची, सदाशिव गड, कराड) या युवकाला २० वर्षे कठोर कारावास आणि २.६० लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश के.एस. होरे यांनी आज हा निकाल दिला.
संगम डुबल याने जानेवारी २०२२ मध्ये पीडित अल्पवयीन मुलीशी सोशल मीडियावर ओळख करून मैत्री केली. त्यानंतर त्याने मुलीला धमकावत अश्लील फोटो काढले व ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार केला. या प्रकरणाची तक्रार पीडितेने कराड शहर पोलीस ठाण्यात केली.
तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक एस.आर. पवार व हवालदार व्ही.एस. सानदे यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. जिल्हा सरकारी वकील आर.सी. शहा यांनी सरकार पक्षाचे युक्तिवाद मांडत पुरावे सादर केले. साक्षीदारांच्या साक्षींना आधार देत न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. आरोपी संगम डुबल याला २० वर्षे कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख ६० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाची शिक्षा होणार आहे. या प्रकरणात पोलीस हवालदार एस.बी. भोसले यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. सरकारी वकील आर.सी. शहा यांनी आरोपीच्या गुन्ह्याची तीव्रता मांडत कठोर शिक्षा मागितली. न्यायालयाने सादर केलेले पुरावे व साक्षी यांचा विचार करून हा निकाल दिला.

# मोटारसायकल वादातून मारहाण

## एका व्यक्तीवर गुन्हा दाखल



**सातारा । प्रतिनिधी**

माझ्या अंगावर मोटारसायकल का घातलीस? या वादातून झालेल्या हाणामारीत महादेव अर्जुन पवार (वय ३५, रा. मंगळवार पेठ, सातारा) यांना डोक्यात व छातीवर दगडाने मारहाण करण्यात आली. सदर घटना २२ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता सातारा येथील पावर हाऊस जवळ घडली. या प्रकरणात अनिकेत मोहन पवार (रा. मंगळवार पेठ, सातारा) याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मोरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# राजीव गांधी अपघात विमा योजनेतून विद्यार्थिनीला मिळाली मदत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी अपघात विमा योजनेतून अपघातातग्रस्त पात्र विद्यार्थ्यांच्या बचत खात्यात शिक्षणाधिकारी, योजना कार्यालय अहिल्यानगर यांच्याकडून मदतीची रक्कम जमा करण्यात आली असून पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.
शालेय विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास, अवयव निकामी झाल्यास अथवा दुर्दैवाने विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास शासनाच्या राजीव गांधी अपघात विमा योजनेतून विद्यार्थी व पालकांना औषधोपचार, शस्त्रक्रिया व मदत म्हणून दीड लाखापर्यंत अर्थसहाय्य केले जाते. नुकत्याच शिक्षणाधिकारी योजना कार्यालय अहिल्यानगर यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त विद्यार्थ्यांच्या खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली.



नगर तालुक्यातील तुकाई मळा प्राथमिक शाळा (केंद्र-गुंडेगाव) येथील अक्षरा अनिल भापकर या विद्यार्थीनीचा ता. १ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी शाळेत खेळताना अपघात झाला होता. तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या कामी शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, उपशिक्षणाधिकारी संजयकुमार सरवदे, विस्तार अधिकारी रविंद्र थोरात, गटशिक्षणाधिकारी नगर तालुका बाबुराव जाधव , विस्तार अधिकारी मंदा माने-जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ सहाय्यक पल्लवी तुंगार, विषयतज्ञ सुधिर लांडगे, माया हराळ, संजय शेलार यांनी विशेष परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य केले.

# कोल्हार येथे राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पा.यांचा सत्कार

**कोल्हार । प्रतिनिधी**

जलसंपदा खात्याचा मंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर ना.विखे पाटील यांचे प्रथमच आपल्या मतदारसंघातील राहता तालुक्यातील श्री क्षेत्र कोल्हार येथे आगमन झाले.प्रथम त्यांनी येथील साडेतीन शक्तीपीठ असलेल्या आई भगवती मातेच्या मंदिरात आई भगवती मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला व त्यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांच्या सत्काराचा स्वीकार केला. मंदिर परिसरात ना.विखे यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्याचे सत्कार, शुभेच्छा, अभिनंदन स्वीकारून त्यांच्याबरोबर मनमोकळी दिलखुलास चर्चाही केली व त्यांच्यासोबत फोटोही काढले तत्पूर्वी राहता तालुक्यातील लोणी येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयातही त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला होता. आई भगवती मातेचे दर्शन घेतल्यानंतर नेहमीच आपणास एक वेगळी ऊर्जा मिळते असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले यावेळी जेष्ठ कार्यकर्ते अशोक शेठ असावा, भाऊसाहेब रघुनाथ खर्डे पा. दत्तात्रय राजभोज, स्वप्निल निबे पा.,ऋषी खर्डे पा.श्रीकांत खर्डे पा.,पंढरीनाथ खर्डे पा.अक्षय मोरे,व असंख्य कार्यकर्त्यांसह येथील पत्रकार बांधव उपस्थित होते. अशी माहिती सह्याद्रीचा राखणदार या दैनिक वृत्तपत्राचे वार्ताहर गणेश सोमवंशी यांनी यावेळी दिली



# कायदेतज्ज्ञ व वकिलांनी कायद्याची माहिती समाजा पर्यंत पोहचवावी-आ.संग्राम जगताप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

कायद्याची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याचे काम वकील व कायदेतज्ज्ञ बांधवांनी करावे.ते समाजातील एक महत्त्वाचा घटक असून सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले कर्तव्य पार पाडावे.समाजात आजही कायद्याचे ज्ञान पूर्णपणे नसल्यामुळे गुन्हे घडण्याचे काम होत आहे.वकील बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करू.बार असोसिएशनच्या माध्यमातून शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती देण्यासाठी वर्षभर कार्यशाळेचे आयोजन करावे.यामध्ये न्यायाधीश ज्येष्ठ वकील यांचे मार्गदर्शन ठेवावे.जेणेकरून उद्याचा युवक देशाचा सक्षम नागरिक निर्माण होईल असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.



अहमदनगर बार असोसिएशनचे नूतन पदाधिकारी अध्यक्ष ड.राजेश कातोरे पाटील,उपाध्यक्ष ड.वैभव आघाव,सचिव संदीप बुरके,सहसचिव मनीष केळगंद्रे, खजिनदार अनुराधा येवले,तसेच कार्यकारणी सदस्य अभिजीत देशमुख,निखिल ढोले, विजय केदार, शिवाजी शिंदे, ज्योती हिमने यांचा आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला.यावेळी मोहटा देवस्थानचे विश्वस्त अँड विक्रम वाडेकर,ड.अनिता दिघे,ड.सुमतीलाल बलदोटा आदी उपस्थित होते. नूतन अध्यक्ष ड.राजेश कातोरे म्हणाले की,अहमदनगर बार असोसिएशनच्या सभासदांनी मला अध्यक्षपदावर काम करण्याची संधी दिली त्या माध्यमातून प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करू.नूतन पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन सभासदांसाठी वर्षभर विविध उपक्रम राबवले जातील. आ.संग्राम जगताप यांनी बार असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत असे ते म्हणाले.

# अहिल्यानगर येथे संग्राम जगताप यांच्या हस्ते कुंडात्मक महादत्त याग सोहळा संपन्न



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

कै. गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय येथील श्री दत्त महाराज मंदिर येथे श्रीमंत सद्गुरु शंकर महाराज मठ यांच्या वतीने भव्यदिव्य ११ कुंडात्मक महादत्त याग सोहळा संपन्न झाला. या याग सोहळ्यात आमदार संग्राम जगताप यांनी सहकुटुंब सहभागी होऊन मनोभावे पूजा केली. सर्व नगरकरांवर सद्गुरु शंकर महाराजांची सदैव कृपादृष्टी राहो असे आशीर्वाद मागितले. या सोहळ्यात श्रींचा अभिषेक, श्री महादत्त याग यज्ञ सोहळा, पूर्णाहुती व आरती व महाप्रसाद कार्यक्रम संपन्न झाले.

आपली भूमी ही संत-महंतांच्या विचाराने व पदस्पर्शाने पावन झाली असून अध्यात्मिकतेचा मोठा वारसा आपल्याला लाभलेला आहे. त्याचे जतन होण्यासाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी होणे गरजेचे आहे. केडगाव येथील श्रीमंत सद्गुरु शंकर महाराज मठ यांच्या वतीने भव्यदिव्य ११ कुंडात्मक महादत्त याग सोहळा संपन्न झाला आहे. धार्मिकतेतून नेहमीच चांगल्या कामाची ऊर्जा व प्रेरणा मिळत असते. सर्वत्र एक सकारात्मकता संचारते. आजच्या पिढीला संस्कृती व परंपरेची माहिती होणे गरजेचे असून आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मनुष्य चंद्रावर गेला असला तरी त्याला अध्यात्मिकतेची जोड असणे गरजेचे आहे. धार्मिकतेच्या संस्कारातूनच सुसंस्कृत पिढी निर्माण होईल. धार्मिक कार्यक्रमांमधून मनाला नेहमीच आनंद मिळत असतो.यावेळी मा.आ.अरुणकाका जगताप, पार्वतीताई जगताप, अशोक महाराज जाधव, सचिनभाऊ जगताप, शितलताई जगताप, सुवर्णाताई जगताप, अभिजीत खोसे, सुमित कुलकर्णी, इं. केतन क्षीरसागर, दिनेश जोशी, सिद्धार्थ जगताप, माऊली जाधव आदी उपस्थित होते.

## सातार्‍यातील घरफोडी प्रकरण

# चोरट्याकडून १.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सातारा । प्रतिनिधी**

शाहूनगर, गोडोली (तालुका सातारा) येथे १९ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या घरफोडीच्या प्रकरणात पोलिसांनी संशयित चैतन्य विलास माने (वय १९, रा. रविवार पेठ, सातारा) याला अटक केली आहे. आरोपीकडून पोलिसांनी १,२७,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस तपासादरम्यान आरोपीने डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या तारांगण कार्यालयातही चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. परंतु, मौल्यवान वस्तू नसल्याने चोरी करण्यात आली नसल्याचे आरोपीने सांगितले.

डीबी शाखेच्या पोलिसांनी संशयित आरोपीकडे चौकशी करताच गुन्ह्याची कबुली मिळवली. चोरी केलेला मुद्देमाल त्याने लपवून ठेवला होता. त्याने इतर गुन्ह्यांमध्येही सहभाग असल्याचा संशय असून,



अधिक तपास सुरू आहे. न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिस निरीक्षक राजेंद्र म्हस्के व सचिन म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शाम काळे, फौजदार सुधीर मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

# ग्रामपंचायतींच्या वादात अडकला रस्ता ;खड्ड्यामुळे नागरिकांचे हाल

**वर्धा । प्रतिनिधी**

शहरातील कारला चौकात नळ पाईपलाईन वारंवार फुटल्यानंतर तयार झालेल्या खड्ड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पाईपलाईन दुरुस्तीनंतर खड्डा व्यवस्थित बुजवला गेला नसल्याने त्यात पाणी साचते, आणि वाहनांची ये-जा होत असताना हे पाणी उडून नागरिकांचे कपडे खराब होत आहेत. हा रस्ता पिपरी मेघे आणि आलोडी या दोन ग्रामपंचायतींच्या सीमेवर असल्याने या समस्येकडे दुर्लक्ष होत आहे.

पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी कारला चौकात नळ पाईपलाईन टाकण्यात आली होती. मात्र, महालक्ष्मी बसतात त्या दिवशी पहिल्यांदा ही पाईपलाईन फुटली आणि त्यानंतर सहा वेळा तीच समस्या पुन्हा उद्भवली. दरवेळी पाईपलाईन दुरुस्त करण्यात आली, परंतु खोदलेल्या रस्त्याचा खड्डा योग्य प्रकारे बुजवला गेला नाही.



खड्ड्यात साचलेल्या पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शाळकरी मुलांची स्कूल बस किंवा इतर वाहने खड्ड्यावरून जात असताना खड्ड्यातील पाणी उडून कपडे खराब होतात, ज्यामुळे नागरिकांना संताप व्यक्त करावा लागत आहे.

हा रस्ता दोन ग्रामपंचायतींच्या सीमेवर असल्याने कोणतीही ग्रामपंचायत जबाबदारी घेत नाही. जीवन प्राधिकरणानेही खड्डा बुजविण्याचे काम केले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असून, हा प्रश्न कधी सुटेल, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत दिव्यांग गटातून परडी ठवरे शाळेचा प्रथम क्रमांक

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा परडी ठवरे येथील दिव्यांग विद्यार्थिनी लक्ष्मी दीपक गुरपुडे हिने उच्च प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. २२ ते २४ डिसेंबर २०२४ दरम्यान झालेल्या या प्रदर्शनीत जलवायू परिवर्तनाचे मानवी जीवनावर होणारे परिणाम या विषयावर सादर केलेल्या प्रतीकृतीस पहिला क्रमांक मिळाला.



तसेच वकृत्व स्पर्धेत पूजा नरेश भेंडाकर हिने प्रथम क्रमांक मिळवून शाळेने वकृत्व स्पर्धेत दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आपली आघाडी कायम ठेवली.

शाळेच्या वतीने या दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले. विज्ञान शिक्षक सुबोध हजारे यांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापक अशोक शेंडे यांचे सहकार्य आणि शिक्षक वृंदाचे पाठबळ विद्यार्थिनींना लाभले. व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप मेश्राम, उपाध्यक्ष नितेश शेंडे, तसेच सदस्य वर्षा बागडे, पुरुषोत्तम गेडाम, शारदा मेश्राम, स्मिता ठवरे, पूनमा ठवरे, कुंदा भेंडारकर, युवराज ठवरे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले. मिंडाळा केंद्र प्रमुख प्रदीप मोटघरे, गटशिक्षणाधिकारी संजय पालवे, विस्तार अधिकारी सुनीता भंडारे, प्रभारी विस्तार अधिकारी प्रभाकर करंबे, केंद्रप्रमुख सोपान सातपुते, भारत बोरकर, राजेंद्र हटवार आणि सर्व CRC-BRC व विशेष शिक्षकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

## स्थानीय गुन्हे शाखेची धडक कारवाई

# गावठी दारू निर्मिती प्रकरणी ४.०१ लाखांचा मुद्देमाल नष्ट

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील स्थानीक गुन्हे शाखेने पावर हाऊसच्या मागील शिवारात गावठी दारू निर्मितीचा पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत एकूण ४,०१,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

२४ डिसेंबर २०२४ रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पथक देवळी तालुक्यातील मौजा देवळी शिवारातील पावर हाऊसच्या मागे गावठी मोहा दारू तयार करण्याच्या ठिकाणी पोहोचले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. घटनास्थळावरून ३,६०० लिटर कच्चा मोहा



दारू रसायन ,लोखंडी ड्रम आणि भट्टीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले . या संपूर्ण मुद्देमालाची किंमत ४,०१,००० रुपये असून, त्याला घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. या प्रकरणी अमर अंबादासजी तांडेकर (राह. आंबेडकर नगर, देवळी) याच्याविरोधात पोलीस स्टेशन देवळी येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या कारवाईसाठी पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. पथकात पोलीस अंमलदार चंद्रकांत बुरंगे, भूषण निघोट, मनीष कांबळे आणि अमोल नगराळे यांचा समावेश होता. ही धडक कारवाई पोलिसांच्या सतर्कतेचे उत्तम उदाहरण असून, अवैध दारू निर्मिती आणि विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी घेतलेला ठोस निर्णय जनतेच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे.

## बीड येथील नव युवकाचा खून

# मृतदेह कुकडी कालव्या मध्ये फेकून दिला

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये एका युवकाचा खून करून त्याचा मृतदेह कुकडी कालव्याच्या पाण्यामध्ये फेकून देण्यात आले. तालुक्यातील नांदगाव शिवारामध्ये पाण्यामध्ये तरंगत वाहत असलेला मृतदेह नागरिकांनी पाहिल्यानंतर पोलिसांना कळवला. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढल्यानंतर हा खून उघडकीस आला.

मृत युवकाची ओळख रणजीत सुनील गिरी (वय २३, बीड) अशी झाली. रणजीत बीडमध्ये हॉटेल आणि ढाब्यावर आचारी म्हणून काम करत होता, मात्र मागील काही दिवसांपासून तो गायब होता. त्याने घरच्यांशी संपर्क साधताना दूरध्वनीवरून मी व्यवस्थित आहे, असे सांगितले होते, ज्यामुळे त्याच्या नातेवाईकांना तो कुठेतरी हॉटेल किंवा ढाब्यावर काम करत असल्याचे वाटत होते.

नांदगाव शिवारामध्ये कुकडी कालव्याच्या पाण्यात एक मृतदेह तरंगताना दिसल्यावर नागरिकांनी



पोलिसांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह बाहेर काढला आणि त्याचे नाव रणजीत सुनील गिरी असल्याचे समजले. यानंतर त्याच्या नातेवाइकांना याबाबत माहिती देण्यात आली.

# कोजबी माल येथील ट्रॅक्टर पलटी झाल्याने मजुराचा मृत्यू



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**


नागभीड तालुक्यातील कोजबी माल येथील मानिक शिवराम शेंडे (वय ४५) यांचा ट्रॅक्टर अपघातात मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी ८.४० वाजता गोविदपूर परिसरात घडली.

दौलत शिवनकर यांच्या विटा वाहतुकीच्या ट्रॅक्टरवर मजुरीचे काम करणारे मानिक शेंडे हे दररोजप्रमाणे ट्रॅक्टरवर होते. गोविदपूर परिसरात जात असताना ट्रॅक्टरची ट्रॉली पलटी झाली. दोन मजुरांपैकी एकाने ट्रॉलीवरून उडी मारून स्वतःचा जीव वाचवला, मात्र मानिक शेंडे यांनी उडी न मारल्याने ते ट्रॅक्टरखाली सापडले आणि त्यांचा मृत्यू झाला. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर मानकर करीत आहेत.

# वर्ध्याला पाचव्या आमदाराची प्रतीक्षा

**वर्धा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीतील पराभवाचा वचपा काढत विधानसभा निवडणुकीत दमदार कामगिरी केली. वर्धा जिल्ह्यात भाजपाचे चार आमदार निवडून आले असून, पाचव्या आमदाराच्या प्रतीक्षेत भाजपाचे कार्यकर्ते आहेत. नुकत्याच झालेल्या ना. डॉ. पंकज भोयर यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात भाजपाच्या संघटनात्मक एकतेचे दर्शन घडले. गारठलेल्या थंडीत विनोद आणि खेळीमेळीच्या वातावरणाने कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला.



१५ वर्षांपूर्वी वर्धा जिल्हा भाजपासाठी कमकुवत मानला जात असे. मात्र, ना. नितीन गडकरी यांनी जामनी साखर कारखाना विकत घेतल्यानंतर भाजपाला उर्जितावस्था मिळाली. डॉ. शिरीष गोडे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची हळूहळू बांधणी झाली. त्यात माजी जिल्हाधिकारी सुधीर दिवे यांचा प्रशासकीय अनुभव वर्ध्यातील भाजपाला एकमुखी नेतृत्व देण्यास उपयुक्त ठरला. सुधीर दिवे यांनी वर्धा नगर पालिकेतील काँग्रेसच्या नगराध्यक्षाविरोधात अविश्वास प्रस्ताव आणून भाजपाचा विजय निश्चित केला. त्यांच्या निर्णायक भूमिकेमुळे २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्येही पक्षाला यश मिळाले. त्यांच्या निर्णयक्षमता, प्रशासकीय कौशल्य, आणि पक्षश्रेष्ठींसोबत थेट संवाद साधण्याच्या क्षमतेमुळे ते वर्ध्यात भाजपाचे संकटमोचक ठरले आहेत.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सुधीर दिवे यांनी चारही विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सांभाळली. आर्वी मतदारसंघात माजी आमदार दादाराव केचे यांच्या बंडामुळे निर्माण झालेल्या पेचप्रसंगातही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. केचे यांना उमेदवारी मिळावी, यासाठी दिवेंनी पक्षश्रेष्ठींचे समर्थन मिळवले आणि त्यांच्या निवडणुकीसाठी मेहनत घेतली.

वर्ध्यातून विधान परिषदेसाठी सुधीर दिवेंची निवड व्हावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुनील गफाट म्हणाले, दिवे आमचे नेते आहेत, आणि त्यांची विधान परिषदेसाठी नियुक्ती होणे गरजेचे आहे. जिल्ह्यातून भाजपाला पाचवा आमदार मिळाल्यास पक्षाच्या संघटनात्मक शक्तीला आणखी बळ मिळेल, अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# संघटीतपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत यश मिळवायचे आहे तयारीला लागा-जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील

**राहुरी । प्रतिनिधी**

आ.अमोल खताळ यांच्या विजयाने तालुक्यात परिवर्तन होवू शकते हा विश्वास विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने सर्वांना मिळाला. भविष्यात अशाच संघटीतपणे आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत यश मिळवायचे असल्याने त्या दृष्टीने तयारी सुरु करा असा संदेश जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला.

जलसंपदा मंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्या नंतर मंत्री विखे पाटील यांनी श्रीक्षेत्र निझर्णेश्वर येथे येवून दर्शन घेतले. या निमित्ताने महायुतीचे पदाधिकारी आणि विखे समर्थक कार्यकर्त्यांनी स्वागत केले. आ.अमोल खताळ, जेष्ठनेते बापूसाहेब गुळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष आबासाहेब थोरात, डॉ.विखे पाटील कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे, प्रवरा सहकारी बॅंकेचे व्हा.चेअरमन मच्छिंद्र थेटे, निवृत्त सनदी आधिकारी शिवाजीराव जोंधळे यांच्यासह जेष्ठ आणि युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ आपण निझर्णेश्वराच्या येथूनच केला होता. परिवर्तनाची सुरुवात ही विधानसभा निवडणूकी पासून सुरु झाली आहे. तालुक्यातील जनतेने महायुतीवर विश्वास ठेवून आ.अमोल खताळ यांना ऐतिहासिक विजय मिळवून दिला, विधानसभेतील या विजयामुळे तालुक्यात परिवर्तन होवू शकते हा विश्वास आपल्या सर्वांना मिळाला आहे असे स्पष्ट करुन, मंत्री विखे पाटील म्हणाले की, भविष्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकाही येणार आहेत. या निवडाणूकीतही आपल्याला तालुक्यात परिवर्तन घडवायचे आहे. विधानसभेच्या निवडणूकी प्रमाणेच संघटीतपणे या निवडणूकीत यश मिळवायचे आहे. त्यादृष्टीने तयार सुरु करा असा संदेशही त्यांनी या निमित्ताने दिला.



भाजपाच्या नेत्यांनी आपल्याकडे आता जलसंपदा विभागाचा कार्यभार सोपविला आहे. यापुर्वी निळवंडे धरणाचे पाणी जिरायती भागाला मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न झाला पण आता एवढ्यावरच आपल्याला थांबायचे नाही. या तालुक्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवून हा भाग दुष्काळमुक्त कसा होईल हाच आपला प्रयत्न असणार आहे. असे सांगून ना.विखे पाटील म्हणाले की, गोदावरी आणि कृष्णा हे सर्वात मोठे खोरे आहे. या भागात येणारे सिंचनाचे प्रकल्प निर्धारित वेळेत मार्गी लावण्यासाठी आराखडा तयार करायचा आहे. तशा सुचनाही आपण विभागाच्या आधिका-यांना दिल्या असून, पश्चिम वाहीनी नद्यांचे पाणी गोदावरीच्या तुटीच्या खो-यात वळविण्याचा महत्वकांक्षी प्रकल्प मार्गी लावण्याचे ध्येय आपले असल्याचे त्यांनी सांगितले.आ.अमोल खताळ यांनी आपल्या भाषणात तालुक्याला सुजलाम सुफलाम करण्याचे भाग्य हे ना.विखे पाटील यांना मिळाले आहे. यापुर्वीही निळवंडे धरणाचे पाणी मिळवून देवून त्यांनी संगमनेर तालुक्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली. भविष्यात आता त्यांच्याच मार्गदर्शनाखाली तालुक्याच्या विकासाची गंगा सुध्दा आपल्याला पुढे घेवून जायची असल्याचे त्यांनी सांगितले. जलसंपदा मंत्री पदावर निवड झाल्याबद्दल ना.विखे पाटील यांचा तसेच जिल्ह्यातील महायुतीच्या आमदारांचा नागरी सत्कार ५ जानेवारी रोजी संगमनेर तालुक्याच्या वतीने आयोजित केला असल्याची माहीती आ.अमोल खताळ यांनी दिली.

# लोककलावंत मेळावा व जागरण गोंधळ परिषद संपन्न

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी शहरात जय मल्हार वाघे मुरळी व गोंधळी सेवाभावी संस्था व लोककलावंत मानधन चळवळ समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने लोककलावंत मेळावा व जागरण गोंधळ परिषद नुकतीच पार पडली. या कार्यक्रमाचे उद्धाटन राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रतापराव ढाकणे यांच्या स्वीय सहाय्यक एम.पी.आव्हाड, उद्धव दुसुंग, आणि सामाजिक कार्यकर्ते विनोद चन्ने यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल काटे, उपाध्यक्ष गहीनीनाथ डोंगरे, तसेच पदाधिकारी रावसाहेब काळे, सोपान घनवट, जनार्दन रोडगे, राजेंद्र क्षीरसागर, अनिल बोरुडे,सुखदेव वाघमारे, मच्छिंद्र शिंदे, अशोक जाधव, बबन खंडागळे, सोमनाथ चन्ने आणि जिल्हा व इतर लोककलावंत उपस्थित होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल काटे यांनी लोककलावंतांना मार्गदर्शन करताना, लोककलेच्या संदर्भात मानधन व त्यासंबंधीची सर्व माहिती दिली. यावेळी



ग्रामीण भागातील लोप पावत चाललेल्या लोककला व कलावंतांच्या अडचणींबद्दल चर्चा करण्यात आली. त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील लोककलावंत अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत आणि त्यांना मानधन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

या मेळाव्यात सहभागी कलावंतांनी शासनाकडे विविध योजनांची योग्य अंमलबजावणी करून लोककला जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी केली. शहरीकरण, धावपळीचे जीवन, बदलती जीवनशैली, औद्योगिकरण आणि उच्चशिक्षणाच्या युगात लोककलांचे महत्त्व अधिक जाणून त्याचा उपयोग समाजाच्या मानसिक आरोग्य आणि समतोलासाठी होणे गरजेचे असल्याचे विविध मान्यवरांनी सांगितले. सायंकाळी विविध विषयांवर चर्चा होऊन या परिषदेचा समारोप झाला. या कार्यक्रमात राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा व्यक्त केल्या. पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यातील संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या परिषदेला यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# तर उद्या आपल्या आजूबाजूला घडू शकते
## बाळासाहेब थोरातांची देशमुखांच्या कुटुबीयांची भेट

**संगमनेर । प्रतिनिधी**

मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राज्यातील राजकारण चांगलचं तापलं आहे. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या करणाऱ्या क्रूरकर्म्यांना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी २८ डिसेंबर २०२४ रोजी बीडमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मोर्चा काढला जाणार आहे.

या मोर्चात आता राष्ट्रवादीचे शरद पवार तसेच जितेंद्र आव्हाड देखील उपस्थित राहणार आहेत. त्याआधी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांशी भेट घेण्यासाठी आता राज्यातील नेत्यांची रिघ लागलेली आहे.

आज काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आज बीडच्या मस्साजोग येथे जाऊन आदर्श सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांच्यासोबत माजी मंत्री अमित देशमुख यावेळी सोबत होते. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण हे अत्यंत गंभीर आहे. बीड सह महाराष्ट्रात कायद्याचा धाक राहिलेला नाही. पोलीस प्रशासन दबावात काम करते आहे. असेही त्यांनी सांगितले.



पुढे बोलतांना ते म्हणाले की, निव्वळ मारेकर्यांना अटक होऊन चालणार नाही, या घटनेचा खरा मास्टरमाइंड शोधावा लागेल, तरच संतोष देशमुख यांच्या बलिदानाला अर्थ आहे. कोणी कितीही मोठा असला, तरी किमान सरकारने त्याला पाठीशी घालू नये! बीडची घटना ही मानवतेला काळीमा फासणारी आहे. जात, धर्म, पक्ष या भेदांच्या पलीकडे जाऊन या गुन्ह्याचा तपास झाला पाहिजे. अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. सरकारने या घटनेची फास्टट्रॅक कोर्टात सुनावणी करून, गुन्हेगारांना कठोर शासन करावे. विरोधक किंवा सत्ताधारी कोणीही या घटनेचे राजकारण करू नये. जर कायद्याचा धाक राहिला नाही तर जे बीडमध्ये घडले ते उद्या आपल्या आजूबाजूला घडू शकते, याचे भान बाळगणे आवश्यक आहे. हा महाराष्ट्र आहे हे कोणीही विसरू नये, अन्याय सहन करण्याची पण एक सीमा असते. बीडच्या घटनेने तर क्रूरतेच्या साऱ्या मर्यादा ओलांडलेल्या आहेत. असेही त्यांनी म्हटलं.

# नगरसेवक अशोक चेडे यांच्याकडून पारनेर बाजार स्थळाच्या कामाची पाहणी

**पारनेर । प्रतिनिधी**

सर्वेक्षण २०२० अंतर्गत वैशिष्ठपूर्ण योजनेअंतर्गत पारनेर नगरपंचायतीस मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेतून बाजार तळाच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. यामध्ये संपूर्ण बाजार तळावर पेव्हींग ब्लॉक बसविणे, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी अंतर्गत गटार योजना तयार करणे, ओटयांची दुरुस्ती आणि दोन प्रवेशद्वारांची देखभाल यांचा समावेश आहे.

नगरसेवक अशोक चेडे यांनी या कामाची पाहणी केली आणि त्यावेळी ते म्हणाले, पारनेरचा बाजारतळ ऐतिहासिक आहे. येथे देशपातळीवरील नेत्यांच्या सभा झाल्या आहेत आणि अनेक सामाजिक, राजकीय घटनांचे साक्षीदार आहे. भविष्यातही या ठिकाणी महत्त्वाच्या नेत्यांची हजेरी लागेल.

चेडे यांनी सुचवले की, पेव्हींग ब्लॉक दर्जेदार हवेत



आणि ओट्यांची दुरुस्ती करताना सिमेंटाचा वापर योग्य पद्धतीने करावा. त्याचबरोबर, ६३ लाख रुपयांचा निधी खर्च होत असताना त्याचे प्रतिबिंब कामाच्या दर्जातून दिसले पाहिजे. ते म्हणाले, काम पूर्ण करून केवळ बिले काढण्याची घाई केल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. ठेकेदाराने वेळेत काम पूर्ण करताना दर्जाकडे लक्ष द्यावे, नसता आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल.

### आ.दाते यांच्या माध्यमातून विविध विकास कामे मार्गी लावणार

**आमदार काशिनाथ दाते यांना साकडे घालून पारनेर नगरपंचायतीसाठी राज्य शासनाच्या नगरविकास खात्याकडून निधी मंजुर करण्यासाठी प्रयत्न करू, अशी माहिती नगरसेवक अशोक चेडे यांनी दिली. ते म्हणाले, लवकरच यासंदर्भात दाते यांची भेट घेणार आहोत.**

### नगरसेवक अशोक चेडे यांचे मत

**चेडे यांनी सांगितले की, भा.ज.पा.चे नगरसेवक असल्याने होणारे काम दर्जेदार असले पाहिजे. तसेच त्यांनी नगरपंचायतीच्या अभियंत्यासह या कामाची पाहणी केली. ठेकेदाराचे प्रतिनिधीही उपस्थित होते.**

# तहसील कार्यालयातील प्रलंबित विषय मार्गी लावा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्यातील अकोले येथील प्रलंबित रेशनकार्ड प्रकरण, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, रेशनकार्ड अनुष्ठान मंजूर करून रेशनवरील धान्य सुरू करणे, यासह विविध दाखल्यांच ऑनलाइन प्रणालीतील अडचणी आदी सर्व विषय तत्काळ मार्गी लावावेत, अशा सूचना आ.डॉ. किरण लहामटे यांनी तहसीलदार व प्रशासनाला दिल्या.



अकोले तहसिल कार्यालयातील सभागृहात आज दुपारी आ.डॉ.किरण लहामटे यांनी तहसीलदार, नायब तहसीलदार, पुरवठा अधिकारीसह प्रशासनाचे कर्मचारी यांची आढावा बैठक घेतली. याप्रसंगी कृ.उ.बा.अकोलेचे संचालक ईश्वर वाकचौरे, राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष अक्षय अभाळे, हरिभाऊ फापाळे, शुभम येलमामे आदी उपस्थित होते.आ. लहामटे यांनी सांगितले की, मागील काही महिन्यांत निवडणूक कामामुळे प्रशासन व्यस्त होते. त्यामुळे तालुक्यातील अनेक कामे प्रलंबित आहे. त्यामध्ये रेशनकार्डची विविध प्रकरणे प्रलंबित आहेत. संजय गांधी योजनेची प्रकरणे, श्रावण बाळ योजना तसेच अनेक ग्रामपंचायत यांनी रेशनवरील धान्य मिळण्यासाठीचे गरजू लाभार्थीचे ठराव पाठवलेले आहे. त्यांचे अनुष्ठान मंजूर करणे बाकी आहे. ज्यामुळे गरजू लाभार्थींना रेशनचे धान्य देता येईल तसेच काही भागात नेटवर्क प्रॉब्लेम येत आहे. विविध दाखलेही ऑनलाईन प्रणालीमुळे प्रलंबित आहेत. अशी अनेक कामे प्रलंबित असून, ती सर्व तत्काळ मार्गी लावाव्यात, अशा सूचना तहसीलदार व प्रशासनाला आ.डॉ.लहामटे यांनी केल्या आहे.

# राहुरीत धुम स्टाईलने गंठण पळविणारा जेरबंद

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी शहरात बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास भर वस्तीमध्ये असलेल्या जंगम गल्ली येथे दोन अज्ञात भामट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण ओरबाडून दुचाकीवरून धूम ठोकल्याची घटना घडली होती. या घटनेबाबत राहुरी पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झालेला असून अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने ही जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला जेरबंद केले आहे. त्याच्याकडून अनेक चोरीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे. आशा नंदकुमार जंगम (वय ४०) व त्यांची मुलगी या दोघी एका किराणा दुकानात सामान घेत असताना दुचाकीवरुन आलेल्या दोन भामट्यांनी आशा जंगम यांच्या गळ्यातील दीड तोळा वजनाचे मीनीगंठण ओरबाडले व दोन्ही भामटे सुसाट वेगात पसार झाले होते.



अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी पोलीस अंमलदार बापूसाहेब फोलाणे, संतोष लोंढे, फुरकान शेख, संदीप दरंदले, रणजीत जाधव, किशोर शिरसाठ, बाळासाहेब गुंजाळ, अमोल कोतकर, आकाश काळे, भाऊसाहेब काळे, सागर ससाणे, प्रशांत राठोड व महादेव भांड आदींचे पथक तयार करून या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. या तपासात सचीन लक्ष्मण ताके रा. शिरसगाव, ता. श्रीरामपूर याने त्याच्या साथीदारासह हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. गुप्त खबऱ्या मार्फत आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले असता आरोपीने सदरचा गुन्हा त्यांचा साथीदार राजेंद्र उर्फ पप्पू भिमा चव्हाण रा. खटकळी, बेलापूर, ता. श्रीरामपूर याच्यासह केल्याची कबुली दिली. पोलीस पथकाने ताब्यातील आरोपीस विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने साथीदारासह राहुरी, लोणी व संगमनेर शहर हद्दीतील सहा चेन स्नॅचिंगचे गुन्हे कबुल केले. आरोपीस गुन्ह्याच्या तपासकामी राहुरी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून त्याने केलेल्या गुन्ह्याचा पुढील तपास राहुरी पोलीस करणार आहे.

### कारखान्यांचा दर २७००ते २८०० रुपयांच्या

# पुढे जाईनाउसाचा भाव ठरलाय तो हवाच,नाहीतर चक्काजाम करणार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने उसाची एफआरपी निश्चित केली असून, ती १०.२५ साखर उताऱ्यासाठी ३ हजार ४०० रुपये ठरवली आहे. परंतु अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक कारखाने २७०० ते २८०० रुपयांच्या भावापुढे जात नसल्याने शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत.

कारखान्यांकडून भावाचे हमीपत्र मिळाले, तरच ऊस तोडू देऊ. यावर तीन हजारांपेक्षा कमी भाव दिल्यास जिल्ह्यात चक्काजाम आंदोलन करू, असा इशारा जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकरी संघटनांनी दिला.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासकीय अधिकारी, शेतकरी प्रतिनिधी, साखर कारखानदार यांच्या उपस्थितीत ऊस दरावर बैठक झाली. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला जिल्ह्यातील सहकारी आणि खासगी २७ साखर कारखान्यांपैकी फक्त ७ साखर कारखानदारांनी भाव जाहीर केले. तर २३ कारखान्यांच्या प्रतिनिधिंनी बैठकीकडे पाठ फिरवली. मोजक्याच कारखान्यांचे कार्यकारी संचालक, तर इतर प्रतिनिधी पाठवले होते.



या बैठकीत हजर असलेले अशोक २७००, काळे २८००, विखे ३०००, संगमनेर २८००, ज्ञानेश्वर २७००, कोल्हे २८००, केदारेश्वर २७००, असा भाव जाहीर केला. जिल्ह्यातील कारखान्यांनी मिळून २७०० ते २८००रुपये भाव ठरवला आहे, ही कारखानदारांची संघटीत गुन्हेगारी आहे, असा आरोप शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते अभिजीत पोटे यांनी केला. केंद्र सरकारने ३४०० रुपये भाव ठरवला आहे, तो साखर कारखान्यांवर बंधनकारक असताना, तीन हजार रुपयांच्या आत कारखानदार दर देत आहे. बाजूच्या जिल्ह्यातील कारखानदार ३००० ते ३४०० रुपये भाव देत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रशासनानं कमी भाव देणाऱ्या कारखानदारांवर कारवाई न केल्यास जिल्ह्यात चक्काजाम आंदोलन करू, असा इशारही शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी या बैठकीत दिला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रावसाहेब लवांडे, शेतकरी संघटनेचे अशोक काळे, शेतकरी प्रतिनिधी नानासाहेब पवार, दीपक पटारे, नानासाहेब तागड, रमेश भालके, सोमनाथ गर्जे, कृष्णा सातपुते, संजय वाघ, मेजर महादेव आव्हाड उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या हातात साखर कारखान्याचे ऊस दराचे हमीपत्र कारखानदारांनी द्यावे. त्यानंतरच ऊस तोडावा, अशी मागणी शेतकरी संघटनांनी केली. गेल्यावर्षीचे पेमेंट देखील कारखान्यांकडे शिल्लक आहे. ते व्याजासह शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. एवढी महत्त्वपूर्ण बैठक असताना, अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार, खासदार ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नेतृत्व करायला तयार नाही, असा टोला अभिजीत पोटे यांनी लगावला. शेतात ऊस तोडणी न करता कारखान्यावर ऊस आणला तर १००० ते १३०० रुपये अधिक भाव दिला जातो. तरीही वाहतूक कपात केली जाते. हार्वेस्टर चालक ऊस तोडणीसाठी ६ हजार रुपये मागतात. ऊस तोडणी मजूरांनाही पैसे द्यावे लागतात, जेवणाची व्यवस्था करावी लागते. वजनकाट्यांची पडताळणी झालेली नाहीत. अशा तक्रारी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधिंनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी याची दखल घेत कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# विधानसभा निवडणुकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील १५१ उमेदवारांनी अंतिम खर्च सादर केला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील १५१ उमेदवारांनी केलेला अंतिम खर्च सादर केला आहे. अहिल्यानगर शहर मतदारसंघाचे आमदार संग्राम जगताप यांनी सर्वाधिक २९ लाख ७३ हजार २६८ रुपये प्रचारासाठी खर्च केला असुन त्याखालोखाल श्रीरामपूरचे काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले यांनी २८ लाख ९३ हजार ४४८ रुपये, तर अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी २८ लाख ७४ हजार ४८८ रुपये प्रचारावर खर्च केल्याची नोंद झाली आहे.

जिल्ह्यातील १२ मतदारसंघांत एकूण १५१ उमेदवारांनी विधानसभा निवडणूक लढवली आहे. निवडणूक प्रचारासाठी प्रत्येक उमेदवाराला ४० लाख रुपयांपर्यंत खर्च करण्यास भारत निवडणूक आयोगाने मुभा दिली होती. यामध्ये स्टार प्रचारकांची सभा, उमेदवारांची तसेच इतर नेत्यांची सभा, रॅली, रॅलीसाठी आवश्यक वाहने, भोजन, नाश्ता तसेच उमेदवारांचे प्रचारार्थ ठिकठिकाणी लागलेले फलक तसेच जाहिराती आदींचा दररोजचा खर्च उमेदवारांना निवडणूक विभागाला सादर करणे बंधनकारक होते. निवडणुकीत उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची तपासणी मतदानापूर्वी तीन वेळा खर्च पथकाने निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत झाली होती. निवडणुकीतील प्रचाराचा अंतिम खर्च निकाल लागला त्या दिवसापासून ३० दिवसांत म्हणजे २३ डिसेंबरपर्यंत सादर करणे उमेदवारांना बंधनकारक होते. दरम्यान, १५१ उमेदवारांच्या अंतिम निवडणुकीचा प्रचार खर्चाची तपासणी १९. डिसेंबर रोजी निवडणूक खर्च निरीक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्या वेळी खर्च कसा सादर करावा याचे मार्गदर्शन उमेदवारांना व त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात आले होते. या मार्गदर्शनानंतर उमेदवारांनी निवडणूक प्रचाराचा खर्च जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे सादर केला असुन निवडणूक कार्यालयामार्फत १५१ उमेदवारांचा निवडणूक खर्च भारत निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आला आहे. १५१ उमेदवारांपैकी राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांच्या उमेदवारांचा खर्च कमीत कमी १० ते जास्तीत जास्त ३० लाखांपर्यंत असल्याचे





दिसत आहे. बहुतांश उमेदवारांनी दर्शविलेला खर्च आणि निवडणूक पथकांनी सादर केलेला खर्च यामध्ये तफावत आढळून आली आहे. मात्र, निवडणूक पथकांनी दर्शविलेला अंतिम खर्चच बहुतांश उमेदवारांनी मान्य केला आहे. अहमदनगर शहर मतदारसंघाचे आमदार संग्राम जगताप यांनी निवडणूक खर्च करण्यात आघाडी घेतली आहे. सर्वांत कमी १० लाख ७६ हजार रुपयांचा खर्च शिर्डीचे अपक्ष उमेदवार डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी केला आहे. शिर्डी मतदारसंघातील विजयी उमेदवार राधाकृष्ण विखे पाटील यांनी २८ लाख २७ हजार ८० रुपये, तर काँग्रेसच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांनी १८ लाख ८० हजार ७७२ रुपये खर्च केला. अकोले मतदारसंघातील पराभूत उमेदवार अमित भांगरे यांनी २५ लाख ७४ हजार, वैभव पिचड यांनी २४ लाख ६९ हजार, कोपरगाव मतदारसंघातील पराभूत उमेदवार संदीप वर्षे यांनी १९ लाख २२ हजार, श्रीरामपूरचे पराभूत उमेदवार लहू कानडे यांनी २७ लाख ९७ हजार, भाऊसाहेब कांबळे यांनी १५ लाख ४२ हजार, नेवाशाचे शंकरराव गडाख यांनी १८ लाख ६० हजार, बाळासाहेब मुरकुटे यांनी १७ लाख ७१ हजार रुपये निवडणूक खर्च केला आहे.कर्जत-जामखेड मतदारसंघातील पराभूत उमेदवार प्रा. राम शिंदे यांचा २२ लाख २२ हजार, श्रीगोद्याचे राहुल जगताप यांचा १५ लाख ८० हजार, अनुराधा नागवडे यांचा १६ लाख ६९ हजार, पारनेरच्या उमेदवार राणी लंके यांचा १२ लाख ८ हजार तर विजय औटी यांचा १५ लाख ६९ हजार रुपये इतका निवडणूक प्रचारावर खर्च झाला आहे.श्रीरामपूर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार लहू कानडे यांच्या खर्चात ५ लाख ८८ हजार रुपये, काँग्रेसचे उमेदवार हेमंत ओगले यांच्या खर्चात ६ लाख ६४ हजारांची तर शिवसेना उमेदवार भाऊसाहेब कांबळे यांच्या खर्चात ५ लाख ३ हजार रुपयांची तफावत आढळून आली. याशिवाय मोनिका राजळे यांच्या खर्चात ७७ हजार ६४०, प्रताप ढाकणे यांच्या खर्चात १ लाख ८४ हजार, किरण लहामटे यांच्या खर्चात ३८ हजार ७७८, संदीप वर्षे यांच्या खर्चात ३७ हजार, तर डॉ. राजेंद्र पिपाडा यांच्या खर्चात ४३ हजार रुपये इतकी तफावत निवडणूक पथकांनी काढली. ही तफावत मान्य करीत या उमेदवारांनी अंतिम खर्च सादर केला आहे.

# अहिल्यानगर जिल्हा दुष्काळमुक्त करणार : राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी आपण पुढाकार घेऊ. अहिल्यानगर जिल्ह्याने शेतीच्या पाण्यासाठी नेहमी संघर्ष केला.

याची आपल्याला जाणीव आहे, अशा शब्दात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. जलसंपदा मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात विखे पाटील यांचे अभिनंदन करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्यासोबत संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, आमदार किरण



लहामटे, जलसंपदा विभागाचे नाशिक विभागाचे अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, मुळा लाभक्षेत्राच्या कार्यकारी आधिकारी सायली पाटील, निळवंडे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे, प्रदिप हापसे, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हारदे आदी उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, राज्यातील जनतेने ज्या विश्वासाने महायुतीला पाठबळ दिले, तो विश्वास आम्ही सार्थ ठरवू. जलसंपदा विभागातून काम करण्याची मोठी संधी आपल्याला मिळाली. गोदावरी आणि कृष्णा हे दोन सर्वात मोठे असे खोरे आहेत. प्रत्येक माणसासाठी पाणी हा महत्वाचा विषय आहे. लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसह जनतेच्याही असलेल्या अपेक्षा या भविष्यात आपल्याला पूर्ण करायच्या आहेत. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून नव नवीन योजना कार्यान्वित करून अहिल्यानगर जिल्हा दुष्काळमुक्त करण्यास आपण प्राधान्य देऊ. सर्वांना सोबत घेऊन राज्याचा पाणीप्रश्न सोडवू.

# सोयाबीन खरेदीचे पेमेंट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा – सभापती रोहोम

**कोपरगाव । प्रतिनिधी**

शासनाने २०२४-२५ या वर्षासाठी सोयाबीनचा आधारभूत दर ४८९२ रुपये प्रति क्विंटल जाहीर केला आहे, आणि या दराने शेतकऱ्यांसाठी कोपरगाव तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्ड येथे सोयाबीन खरेदी सुरू केली आहे. यामुळे सध्या बाजारात पडलेले सोयाबीनचे भाव आणि शेतकऱ्यांच्या चिंता कमी होण्यास मदत झाली आहे.

याबाबतची माहिती सभापती साहेबराव रोहोम आणि उपसभापती गोवर्धन परजणे यांनी दिली. त्यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगावच्या सोयाबीन खरेदी केंद्रावर ३७ शेतकऱ्यांनी एकूण ६३६ क्विंटल (१२७२ गोणी) सोयाबीन विक्री केली. यावरून ४८९२ रुपये प्रति



क्विंटल दराने ३११३१२ रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२४ आहे. सध्या ९०० शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिकृतपणे सोयाबीन विक्रीसाठी सुलभ मार्ग मिळाला आहे. शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ऑनलाईन नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बाजार समितीचे सचिव नानासाहेब रणशूर यांनी शेतकऱ्यांना कडी कचरा, माती, बुरशी व जाळी नसलेला आणि उत्तम प्रतीचा सोयाबीन विक्रीस आणण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल अधिक चांगल्या भावाने विकला जाईल. सर्वसाधारणपणे, या खरेदी केंद्रामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळवून देणे, तसेच त्यांना आधारभूत दरावर त्वरित पेमेंट दिले जाणे, यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि कृषी क्षेत्राला चालना मिळेल, असे मानले जात आहे.

# ‘साई आदर्श’ ला बॅंको ब्ल्यू रिबन पुरस्कार जाहीर

**राहुरी । प्रतिनिधी**

साई आदर्श मल्टीस्टेट या संस्थेस नुकताच बँको ब्लु रिबन पतसंस्था पुरस्कार जाहीर झाला आहे.महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात बळकटी आणणाऱ्या पतसंस्थांना त्यांच्या कार्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने कोल्हापूर येथील अविज पब्लिकेशन्स व पुणे येथील गॅलेक्सी इनमा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी बैंको पुरस्काराचे आयोजन केले जाते. यावर्षीच्या बँको पतसंस्था पुरस्कारासाठी साई आदर्श मल्टीस्टेटने सादर केलेल्या माहितीच्या आधारे तज्ञ निवड समितीने केलेल्या मूल्यांकनानुसार मल्टीस्टेट पतसंस्था विभागामध्ये बँको पतसंस्था पुरस्कारासाठी साई आदर्श मल्टीस्टेटची निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराचे वितरण ३१ जानेवारी रोजी लोणावळा येथील अंबिव्हॅली सिटी येथे करण्यात येणार आहे.




पुरस्कार मिळाल्यानंतर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव कपाळे म्हणाले की हा पुरस्कार म्हणजे आम्ही केलेल्या चांगल्या कामाची पावती आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी गेल्या ११ वर्षापासून आम्ही अविरतपणे प्रयत्न करत आहोत यामध्ये संचालक मंडळ, कर्मचारी, पिग्मी एजंट यांचे मोठे सहकार्य लाभले आहे. सभासद, ठेवीदार, खातेदार यांनी मोठा विश्वास आमच्यावर टाकला आहे त्यास आम्ही कधी तडा जाऊ देणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली.

# सेंट जॉनमध्ये मंत्रमुग्ध करणारे वार्षिक संमेलन उत्साहात पार पडले

**पुलगाव । प्रतिनिधी**

यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात २३ व २४ डिसेंबर २०२४ रोजी दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. रिलेशन (नातेसंबंध) या थीमवर आधारित या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तेज मुचरेला (उद्योजक आणि सोशल वर्कर, यूएसए) आणि सारंग कुलकर्णी (उद्योजक आणि सोशल वर्कर) होते. शाळेच्या प्रेसिडेंट प्रीती बोरसे, प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे, प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्य



आरती कुर्जझडकर, महेंद्र भोयर, सविता इंगळे, यशोदामाई बोरसे, मंगेश जगताप व इतर मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.

विद्यार्थ्यांनी नातेसंबंध या थीमला अनुसरून विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. बालगायक वाद्यवृंद गटाने आपल्या मधुर गायन आणि वाद्यसंगतीच्या कौशल्याने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसह इयत्ता पहिली ते अकरावीतील क्लास टॉपर्सचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या वार्षिक अहवालाद्वारे प्राचार्य संतोष यादव यांनी शाळेच्या यशस्वी वाटचालीची माहिती दिली आणि नातेसंबंध टिकवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन तन्वी वर्मा, विधी पोकळे, सिद्धांत फुसाटे, दिव्याला आटे व संजय यादव यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुस्कान धामिया व निखिल डांगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनावर अमिट छाप पाडली आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मंच उपलब्ध करून दिला.

# मंदिरात भक्ताने दिलेले दान ताब्यात घेण्याचा सरकारला अधिकार नाही–महंत रामगिरी महाराज यांचा सवाल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

हिंदूच्या मंदिरात उत्पन्न दिसायला लागले की ते मंदिर सरकार ताब्यात घेते. शेकडो हजारो कोटींचे व्यवहार होणारी इतर धर्मियांची मंदिरे सरकारने ताब्यात घेतले नाहीत. त्यामुळे हिंदू मंदिरात भक्ताने दिलेला पैसा सरकारने ताब्यात घेण्याचा अधिकारच काय?

असा सवाल महंत रामगिरी महाराज यांनी शिर्डी येथे आयोजित राज्यस्तरीय मंदिर न्यास परिषदेत बोलताना त्यांनी केला आहे.शिर्डीत महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेचे दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.मंगळवार आणि बुधवार असे दोन दिवस ही परिषद संपन्न होत आहे. राज्यभरातील एक हजाराहून अधिक मंदिर प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले आहेत. महाराष्ट्र मंदिर महासंघ, मुंबई येथील जिवदानी देवी संस्था,



ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, साई पालखी निवारा आणि हिंदू जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे, मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे, वक्फ कायद्याद्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यावर उपाय, मंदिरे आणि तिर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य-मांस बंदी, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर या परिषेद होणार चर्चा होणार आहे.हा पैसा केवळ देवस्थान किंवा इतर मंदिरासाठी वापरला जावा असेही मत यावेळी रामगिरी महाराज यांनी व्यक्त केला आहे.

# मनुस्मृती दहन दिन आणि अमित शहाच्या वक्तव्याचा निषेध

**पुलगाव । प्रतिनिधी**

(२५ डिसेंबर)स्थानिक नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष कृती समितीच्या सदस्यांनी मनुस्मृती दहन दिन साजरा केला. यावेळी मनुस्मृती मुर्दाबाद अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. समितीच्या सदस्यांनी मनुस्मृतीची होळी करून तिच्या विरोधातील आपला संताप व्यक्त केला. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर केलेल्या विधानाचा तीव्र निषेध करत त्यांच्या फोटोचेही दहन केले.

या आंदोलनात राजूभाऊ लोहकरे, विनोद बोरकर, प्रकाश टेंभुर्णे, सचिन मुळे, सिद्धार्थ डोईफोडे, दिलीप टेंभुर्णे, हर्षपाल मेंढे आणि



देवानंद येसनकर यांचा सक्रिय सहभाग होता. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही, असा ठाम इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. त्यांनी सामाजिक समतेसाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# एक सूर एक तालात विद्यार्थ्यांनी गायली देशभक्तीपर गीते

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आ डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारच्या कलागुणांना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी जयहिंद लोकचळवळीच्या वतीने आयोजित कला महोत्सवात तीन दिवसात १५००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.तर आज ७२०० विद्यार्थ्यांनी एक तालात देशभक्तीपर गीते गाऊन परिसर दुमदुमून दिला.सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुलात जयहिंद लोकचळवळीच्या वतीने भव्य तीन दिवसीय कला महोत्सवाचे आयोजन झाले.

या वेळी क्रीडा संकुलाच्या हिरव्यागार मैदानावर विविध शाळांमधील ७२०० विद्यार्थ्यांनी सामूहिक गीतामध्ये सहभाग घेतला.एक सूर एक तालात बलसागर भारत हो,विश्वात शोभूनी राहो हे गीत विद्यार्थ्यांनी प्रचंड मोठ्या उत्साहाने सादर केले.तर सारे जहाँ से अच्छा हिंदुस्तान हमारा या गीताने प्रत्येकाच्या अंगावर शहारे आणले. टाळ्यांच्या निनादात सादर केलेले उधळीत शीतकीरणा,उजळीत जन हृदया या गीताने धमाल केली.तर जगी घुमवा रे,दुमदुमवा रे भारत गौरव गाण या गीतातील एक स्वरातील लयबद्धतेने सर्वांना मंत्रमुग्ध केले.यानंतर सर्व विद्यार्थी शिक्षक यांनी मिळून केलेल्या झुंबा डान्सने धमाल केले.यामध्ये माजी आ.डॉ.सुधीर तांबे यांनीही सहभाग घेतला.

यावेळी बोलताना डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, निरोगी व निकोप समाज निर्मितीसाठी जय हिंद लोक चळवळीच्या माध्यमातून काम होत आहे.कला व क्रीडा हे गुण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक विद्यार्थ्याला कला गुणांची अधिक माहिती व्हावी याकरता या शिबिराचे आयोजन केले आहे.तीन दिवसांमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून यामधून मिळालेले प्रशिक्षण नक्कीच विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी ठरणार आहे.या पुढील काळात ही यापेक्षाही मोठे कला महोत्सव घेतले जातील असे ते म्हणाले.

बालभारतीचे डॉ.अजय कुमार लोळगे म्हणाले की,या शिबिरात विविध प्रकारच्या २३ कलांचे प्रशिक्षण देण्यात आले.तीन दिवस सुमारे पंधरा हजार विद्यार्थ्यांनी सहभा ग घेताना या महोत्सवाचा आनंद घेतला.हा महोत्सव प्रत्येकाच्या जीवनात मोठा ठेवा ठरणार असून शैक्षणिक अभ्यासाबरोबर उपक्रमशील अभ्यासक्रम देण्यासाठी जयहिंदचा हा कौतुकास्पद प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.



# सुपा गाव बनतेय भारतीय जनता पार्टीचे केंद्रबिंदू

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यात भारतीय जनता पार्टीची ताकद वाढताना दिसत आहे, आणि यामध्ये सुपा गाव हे महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरू लागले आहे. सुपा गाव सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोनातून आधीच महत्त्वाचे मानले जात होते, पण अलीकडच्या काळात हे गाव भारतीय जनता पार्टीच्या राजकीय घडामोडींसाठीही विशेष ठरत आहे. महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीची सत्ता आल्यामुळे विकासकामांना गती मिळाली आहे. या सत्तेमुळे पारनेर तालुक्याला, विशेषतः सुपा गावाला मोठ्या प्रमाणावर विकास निधी उपलब्ध झाला आहे. विधान परिषदेचे अध्यक्षपद रामजी शिंदे यांच्याकडे असून, जलसंपदा मंत्री म्हणून राधाकृष्ण विखे पाटील काम पाहत आहेत. त्यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्याला विकासकामे मिळविण्याचा विशेष प्रयत्न सुरू आहे. सुपा गावात भारतीय जनता पार्टीचे स्थानिक नेते सागर भास्कर मैड यांच्या संपर्क कार्यालयात विधान परिषदेचे सभापती रामजी शिंदे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सुपा येथे सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी तालुक्याच्या पाणीप्रश्न सोडविण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांनी सांगितले की, सुपा गावासह पंचक्रोशीत विविध उपक्रम राबवण्याचे नियोजन सुरू आहे. येणाऱ्या काळात सुपा गावात भाजप महायुतीच्या नेत्यांकडून विकासकामांच्या भूमिपूजन आणि लोकार्पणासाठी नियमित भेटी होतील.

कार्यक्रमाला भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये विश्वनाथ कोरडे, राहुल पाटील शिंदे, सागर मैड, अश्विनीताई थोरात, वसंत चेडे, दत्तात्रय पवार, संतोष गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. सुपा गाव भाजपच्या राजकीय केंद्रस्थानी आल्यामुळे गावाचा विकास अधिक वेगाने होण्याची शक्यता आहे. येणाऱ्या काळात विकासकामांसाठी महत्त्वाची निर्णयप्रक्रिया सुपा गावातून होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



## आदिवासी व ओबीसी शेतकऱ्यांची फसवणूक

# जय बिरसा ट्रायबल फार्मर प्रोड्युसर कंपनीवर गुन्हा दाखल

**भंडारा । प्रतिनिधी**

तुमसर तालुक्यातील चिंचोली येथील जय बिरसा ट्रायबल फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या संचालक आणि व्यवस्थापकांनी आदिवासी व ओबीसी शेतकऱ्यांना सबसिडीवर शेतीसाठी लागणारे ट्रॅक्टर आणि अवजारे देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या कंपनीची स्थापना ४ मे २०२२ रोजी करण्यात आली. लेंडेझरी येथे कार्यालय उघडून चिचोली शाखेच्या माध्यमातून आदिवासी व ओबीसी शेतकऱ्यांना ९० टक्के आणि ५० टक्के सबसिडीवर शेतीसाठी आवश्यक साहित्य देण्याचे वचन देण्यात आले. त्यानुसार, आदिवासी शेतकऱ्यांकडून १,३०,०००/- रुपये तर ओबीसी शेतकऱ्यांकडून २,६०,०००/- रुपये घेण्यात आले. तसेच आधार कार्ड, रेशन कार्ड, आणि ७/१२ उताऱ्याच्या झेरॉक्स प्रत मागवून काहींना साहित्य वाटप केले. मात्र, अनेक शेतकऱ्यांना साहित्य न देता ट्रॅक्टर पासिंगच्या नावाखाली २२,७००/- रुपये घेतले गेले आणि ते फसवले गेले.

फसवणुकीची रक्कम करोडो रुपयांपर्यंत असल्याचा संशय आहे. त्यामुळे तुमसर पोलिसांनी या प्रकरणी अपराध क्रमांक ४७०/२०२४ नुसार विविध कलमांखाली गुन्हा नोंदवला असून तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या आदिवासी व ओबीसी शेतकऱ्यांनी या कंपनीकडे पैसे भरूनही शेतीसाहित्य किंवा ट्रॅक्टर मिळालेले नाहीत, त्यांनी पुरावे घेऊन आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा येथे आपली तक्रार नोंदवावी.फसवणुकीचे प्रमाण मोठे असल्याने पोलिसांनी संबंधित शेतकऱ्यांना त्वरित पुढे येऊन न्यायासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# जे.एम.पटेल महाविद्यालय नेटबॉल संघ विजयी:सलग दहा वर्षांची विजेतेपदाची परंपरा

**भंडारा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धेत जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा महिला संघाने सलग दहाव्यांदा विजेतेपद मिळवले आहे. ही स्पर्धा नुकतीच एन. एम. डी. कॉलेज, गोंदिया येथे आयोजित करण्यात आली होती. महिला गटातील अंतिम सामन्यात जे. एम. पटेल महिला संघाने एन. एम. डी. कॉलेज, गोंदिया संघावर एकतर्फी विजय मिळवून आपली विजयी परंपरा कायम राखली.कु. पायल कुंभलकर, कु. दिव्या काकडे, कु. अंजली कुंभारे, कु. नंदिनी भोखले, कु. सना शेख, कु. सायमा शेख, कु. तृप्ती काटोरे, कु. रोहिणी हेडाऊ, कु. इशिका उकरे, कु. सुहानी खवास आणि कु. पुरवा कलंबे यांचा समावेश होता. संघाने आपले यश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भीमराव पवार, डॉ. कार्तिक पन्निकर, डॉ. शाम डफरे आणि डॉ. रोमी बिष्ट यांना दिले आहे.



गोंदिया शिक्षण संस्थेचे सचिव आणि माजी आमदार राजेंद्र जैन, निखिल जैन, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिक्षकांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनीही संघाच्या ऐतिहासिक कामगिरीवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. स्पर्धेतील या कामगिरीमुळे जे. एम. पटेल महाविद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावला आहे.

# विदर्भातील दुग्धोत्पादनाला सहकारातून नवी दिशा-डॉ.पंकज भोयर

## सहकार चळवळीला बळ देण्यासाठी राज्य शासनाचा पुढाकार

**नागपूर । प्रतिनिधी**

सहकार विभागाच्या माध्यमातून विदर्भातील दुग्धोत्पादनाला चालना देण्याची गरज असून, सहकार चळवळ बळकट करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.

केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली 'सहकार से समृद्धी' या केंद्र शासनाच्या उपक्रमाअंतर्गत देशभरातील दहा हजार बहुउद्देशीय संस्थांची नोंदणी करण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ नवी दिल्ली येथे आयोजित विशेष कार्यक्रमाद्वारे झाला. नागपुरातील जिल्हा नियोजन भवन येथून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले.

राज्यातील सहकार चळवळीचा ऐतिहासिक वारसा पुढे नेण्याचे आवाहन करत डॉ. भोयर म्हणाले, सहकारातून समृद्धी हा उपक्रम सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. यामुळे सहकारी संस्थांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढेल आणि ग्रामीण भागात शासकीय लाभ सहजपणे पोहोचवता येईल.

उपक्रमाअंतर्गत प्राथमिक सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण, सहकारी साखर कारखान्यांची क्षमता वाढवणे, तसेच व्यवसाय सुलभतेसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. याशिवाय ग्रामीण बँकांचे बळकटीकरण व पारदर्शकता वाढवण्यावरही भर दिला जाईल.

राज्य शासन या उपक्रमांसाठी सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही डॉ. भोयर यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक सहनिबंधक प्रवीण वानखेडे होते, तर जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांच्यासह सहकार विभागातील अधिकारी उपस्थित होते. सहकारातून दुग्धोत्पादन व इतर क्षेत्रांना चालना देण्यासाठी हा उपक्रम विदर्भाच्या ग्रामीण व सहकारी संस्थांसाठी नवी संधी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



## ढीवर-भोई समाजातील उपवर-वधू यशस्वी परिचय मेळावा

# २१ व्या वर्षात आयोजीत,या मेळाव्यात ५० मुलांची व १४० मुलींची नोंदणी

**भंडारा । प्रतिनिधी**

२५ डिसेंबर २०२४ रोजी बुधवारला इंद्रलोक सभागृहात ढीवर समाजातील उपवर मुला-मुलींचा परिचय मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याचे हे २१वे वर्ष असून, यंदाच्या मेळाव्यात ५० मुलांची व १४० मुलींची नोंदणी झाली. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती आणि प्रसिद्धी मिळाल्यामुळे समाजातील युवक आणि युवतींमध्ये उत्साहाचे वातावरण होते.



मेळाव्याचे अध्यक्ष डॉ.प्रकाश मालगावे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.टी.डी.मारबते यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून त्यांना जनार्दन खेडकर, प्रकाश पचारे, के. एन. नान्हें, शिवचरण दूधपचारे, संजय केवट, मनीष काटकर, प्रकाश डायरे, मिराताई नगरे,पल्लवी केवट उपस्थित होते.मान्यवरील मार्गदर्शन करताना मुलांची नोंदणी कमी होणे यावर चिंता प्रकट करून मुलांनीही नोंदणी करण्यात व आपला परिचय देण्यास संकोच करू नये असे आवाहन केले उपवर मुला-मुलींच्या या मेळाव्यात व अन्य ठिकाणी जी विवाह जोडतात ते सामूहिक विवाह सोडत संपन्न करावे असेही आव्हान केले सामूहिक विवाह सोहळा फक्त आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्यांसाठी नसून सामाजिक संघटन बांधणीच्या उपक्रम समजावा तसेच आर्थिक संपन्न असलेल्या समाज बांधवांनी आपल्या परत परिवारातील मुला मुलींचे लग्न सामायिक विवाह सोहळ्यातच संपन्न करावे असे विचार अध्यक्ष भाषणात केले. कार्यक्रमाचे संचालन अनिल दिघोरे व जयप्रभा मारबते यांनी केले. तर समाज बांधवांचे आभार सुभाष उके यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अजय मोहनकर, हरीश डायरे, सतीश मारबते, हेमंत केलवदे, हरिश्चंद्र केवट, सुनील शिवरकर, विनोद मांढरे, प्रवीण मडामे, दीपक मारबते, योगेश दूधपचारे, रविंद्र मानकर, संजीव भूरे, रवि उके, पुरुषोत्तम मडामे, सुरेश खंगार आणि तुषार मेश्राम यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

# मराठा ११ बटालियन जवान अक्षय निखुरे शहीद

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव (मारोती )येथील अक्षय दिगंबर निखुरे, मराठा ११ बटालियनमध्ये कार्यरत जवान, यांचा वाहन अपघातात मृत्यू झाला. गाडी खोल दरीत कोसळल्याने या दुर्घटनेत १८ जवानांपैकी पाचांचा मृत्यू झाला आहे. मृतक जवानाच्या वडिलांना ही दुर्दैवी बातमी वर्ध्याहून रजेवर आलेल्या एका सहकाऱ्याने दिली.



अक्षय यांनी बी.ए. फायनलचे शिक्षण घेत असताना २१ व्या वर्षी भारतीय सैन्यात २०१८ साली प्रवेश केला. अल्पभूधारक शेतकरी असलेल्या त्यांचे वडील व आई चार एकर शेती करतात. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या दोन्ही मुलांना देशसेवेसाठी पाठवणाऱ्या या आई-वडिलांबद्दल परिसरात आदर व्यक्त केला जात आहे.

अपघाती मृत्यूने पिंपळगाव परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतक जवानाच्या पश्चात त्यांचे वडील, आई आणि भारतीय सैन्यात कार्यरत एक भाऊ असा परिवार आहे. उद्या मृतक जवानांचे शासकीय इतमामात स्वगावी अंतिम संस्कार होणार आहेत.जवानांच्या कुटुंबाने हलाखीच्या परिस्थितीतही देशसेवा करणाऱ्या दोन्ही मुलांना सैन्यात पाठवले होते. त्यांच्या बलिदानामुळे परिसरातील लोक कृतज्ञता व्यक्त करत असून, शोकसंतप्त वातावरण आहे.


# नववर्षाच्या स्वागतासाठी साईबाबा संस्थान सज्ज

**शिर्डी । प्रतिनिधी**

नाताळ या सणाच्या निमित्ताने मिळालेल्या सुट्टीचा फायदा घेत गतवर्षाला निरोप देण्यासाठीव नववर्षाच्या स्वागता साठी शिर्डीमध्ये भाविक भक्तांची आणि पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्यामुळे शिर्डीच्या साई संस्थान प्रशासनाने भाविक भक्तांना विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न शील आहेत.

उत्कृष्ट व्यवस्थापनासाठी ओळखले जाणारे संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गाडीलकर डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात संपूर्ण देशभरातून आणि देशाबाहेरून शिर्डीला भेट देणाऱ्या पर्यटकांना आणि भाविक भक्तांना सोई सुविधा देण्यामध्ये कोणत्याही प्रकारची उणीव राहू नये, यासाठी प्रशासनाची सर्व अधिकार्यांना आणि कर्मचार्यांना आदेश दिलेले आहेत.

भाविक भक्तांसाठी संस्थान प्रशासनानं भाविक भक्तांसाठी अतिशय वाजवी दरामध्ये निवास व्यवस्था उपलब्ध करून देणार असुन त्याचबरोबर साईबाबा संस्थान यांच्या तीन भोजनगृहामध्ये दिवसभर मोफत अन्नदान केले जाणार आहे. त्याचबरोबर संस्थांनने दोन रुपयात चहा आणि तीन रुपयात कॉफी आणि दूध उपलब्ध करून दिलेला आहे. मंदिरापासून तर प्रसादालयापर्यंत जाण्यासाठी भक्तांसाठी आराम बसेसची सुविधा उपलब्ध केलेली आहे. साईंच्या दर्शनासाठी यापूर्वी असलेले अनेक कडक नियम सध्या शिथिल करण्यात आलेले आहेत. भाविकांना देण्यात येणार्या सर्वच प्रकारच्या सोयी सुविधांमध्ये तसेच स्वच्छतेबाबत कोणतीही कसर राहू नये किंवा दिरंगाई होऊ नये म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर हे स्वतः जातीने लक्ष देऊन आहेत. स्वच्छता विभाग, वीजपुरवठा विभाग, पाणीपुरवठा व आरोग्य विभागातील अधिकार्यांच्या बैठका घेऊन सर्वांना योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. गोरक्ष गाडीलकर हे शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदलून आल्यापासून



संस्थानच्या कारभारात सुसूत्रता आणि पारदर्शकते बरोबरच गतिमानता आलेली आहे. अयोध्या येथे राममंदिर निर्माणानंतर देशातील भाविक भक्तांचा मोठा ओघ हा तिकडे वळालेला आहे. त्यामुळे अलीकडच्या काळात शिर्डी येथे येणाऱ्या भाविक भक्तांची संख्या काही प्रमाणात घटकांना दिसून येत आहे. शिर्डी मधील काही व्यापार्यांशी चर्चा केल्यानंतर अनेक बाबी समोर आल्या त्यात ही एक महत्त्वाची बाब आहे. स्वतःच्या वाहनाने शिर्डीला येणाऱ्या भाविक भक्तांना गाड्या अडवून पोलिसांचे त्रास देणे असो किंवा पार्किंगच्या नावाखाली नगरपरिषद प्रशासन करत असलेली भावीक भक्तांची लूट असो. या कारणामुळे अनेक पर्यटक आणि भाविक भक्त शिर्डीला भेट देण्याचे टाळत असल्याची येथे चर्चा आहे. दुसरी बाब म्हणजे गोव्यात नवीन आलेल्या भाजपा सरकारनं त्या राज्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी अनेक नियम शिथिल करून खूप मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध केल्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी पर्यटक शिर्डी ऐवजी गोव्याला अधिक पसंती देऊ लागले आहेत. या सार्या पार्श्वभूमीवर शिर्डीला भेट देणार्या भाविक भक्तांना आणि पर्यटकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये अथवा अडचण येऊ म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर हे स्वतः काळजी घेताना दिसून येत आहे. भक्त निवासासमोरील प्रशस्त उद्यान भावी भक्तांच्या आणि पर्यटकांच्या पसंतीस उतरलेले आहे. शिर्डीला भेट देणारा प्रत्येक पर्यटक हा उद्यानातून फेरफटका मारतोच. त्यांच्या योग्य नियोजनामुळेच शिर्डीकर आणि भाविक भक्त यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण आहे. असे असले तरी नगरपंचायतचे मुख्याधिकारी दिघे यांनीही आपल्या प्रशासनात सुधारणा करून भाविक भक्तांच्या आणि पर्यटकांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे येथे बोलले जात आहे. असे झाले तरच भारतभरातून शिर्डी येथे साईंच्या दर्शनासाठी येणारा भक्त पुन्हा पुन्हा आनंदाने आणि समाधानाने येऊ शकेल आणि येथे वास्तव्य करू शकेल.

# राज्यातील खनिज संपदेचा विकास पर्यावरणीय संतुलनासह-डॉ.भोयर

## खनिज क्षेत्रासाठी कालसुसंगत नियोजन व रोजगार निर्मितीवर भर

**वर्धा | प्रतिनिधी**

राज्यातील विपुल खनिज संपदेचा विकास पर्यावरणीय संतुलन राखत आणि कालसुसंगत व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून करणे आवश्यक आहे. खनिज क्षेत्राशी संबंधित औद्योगिक विस्तार व रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाने या दिशेने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

डॉ. भोयर यांनी नागपूर येथील भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय कार्यालयात आढावा बैठक घेतली. यावेळी महासंचालक डॉ. टी. के. राव, संचालक डॉ. गजानन कामडे, उपसंचालक श्रीराम कडू, रोशन मेश्राम, आणि सहसंचालक अंजली नगरकर उपस्थित होते. राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी खनिज क्षेत्रातील रोजगार निर्मिती व औद्योगिक विस्तार यावर भर देण्याची गरज व्यक्त केली. चंद्रपूर, नागपूर, भंडारा, आणि यवतमाळ जिल्ह्यांतर्गत सुरू असलेल्या अन्वेषण प्रकल्पांबाबत त्यांनी माहिती घेतली. लाईमस्टोन, सोनं, तांबं, बॉक्साईट, आणि लोखंड यांसारख्या महत्त्वाच्या खनिजांच्या प्रकल्पांबाबत विशेष चर्चा करण्यात आली. भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयांतर्गत राज्यात प्रामुख्याने आढळणारी प्रमुख व गौण खनिजे, तसेच राबविण्यात येणाऱ्या पूर्वेक्षण योजना आणि दैनंदिन कामकाजाबाबत संचालक डॉ. गजानन कामडे यांनी सविस्तर माहिती दिली. संचालनालयाच्या रिक्त व मंजूर पदांबाबतही आढावा घेण्यात आला. खनिज क्षेत्राचा विकास करताना पर्यावरणीय संतुलनाचा विचार महत्त्वाचा आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या संधी शोधून त्यांचे नियोजन केले जावे, असे मत डॉ. भोयर यांनी व्यक्त केले. राज्यात खनिज क्षेत्राच्या विकासासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




# ब्रम्होत्सव समारोह निमित्त निघालेल्या शोभा यात्रेचे भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्वागत

## शोभायात्रेत सहभागी भक्तांना शीतपेयाचे वाटप

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

श्री तिरुपती बालाजी देवस्थानच्या वतीने सातव्ब्रया म्होत्सवाचे तीन दिवसीय आयोजन करण्यात आले होते. या निमित्त आज शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. सदर शोभायात्रेचे भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर विधानसभेच्या वतीने गांधी चौक येथे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी भक्तगणांसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने शीतपेयाची व्यवस्था करण्यात आली होती.



श्री तिरुपती बालाजी देवस्थानच्या वतीने बालाजी मंदिर येथे तीन दिवसीय ब्रम्होत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. येथे तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर आज महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमानिमित्त शहरातून शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेचे स्वागत करण्यासाठी गांधी चौक येथे स्वागत मंच उभारण्यात आला होता.

शोभायात्रा स्वागत मंचाजवळ पोहोचताच भारतीय जनता पक्ष, चंद्रपूर विधानसभा क्षेत्राच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी बालाजी भक्त आणि चंद्रपूरकरांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने शीतपेयाचे वाटप करण्यात आले.

# वरंध-कुंभारकोंड येथे विद्युत ट्रान्सफॉर्मरची चोरी

## अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

**महाड | प्रतिनिधी**

महाड तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून आता चोरांनी ग्रामीण भागाकडे आपला मोर्चा वळवला आहे. वरंध-कुंभारकोंड येथील बाळकृष्ण विजय धनावडे यांच्या शेतातील लोखंडी पोलावर बसवलेला विद्युत ट्रान्सफॉर्मर चोरट्यांनी लंपास केला.



ही घटना २३ डिसेंबर रोजी घडल्याचे समोर आले असून, चोरट्यांनी सुमारे ४२,४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. यामध्ये १०० किलो तांब्याची तार आणि ४० लिटर ऑइलचा समावेश आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय विद्युत अधिनियम २००३, कलम १३६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही महिन्यांपूर्वी अशाच प्रकारच्या चोरीदरम्यान एका चोरट्याचा विजेचा करंट लागून मृत्यू झाला होता. शहर आणि ग्रामीण भागातील वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलीस प्रशासनावर दबाव वाढला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक इकबाल शेख या प्रकरणाचा तपास करत आहेत. ग्रामीण भागातील चोरीचे सत्र थांबवण्यासाठी स्थानिक पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे

# २७-२८ डिसेंबरदरम्यान राज्यात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

## खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करावे

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

दिनांक २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

२७ डिसेंबरला दूपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.



२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.२९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# पूर्व प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांना आदरांजली



**चंद्रपूर | प्रतिनिधी**

देशाचे पूर्व पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयीजी यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या पावन स्मृतिस राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी अभिवादन करून आदरांजली वाहिली.

जनसंपर्क कार्यालयात दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी श्रध्देय अटलजींच्या प्रतिमेस माल्यार्पण करीत अहीर यांनी अटलजींनी देशाकरिता दिलेल्या भरीव योगदानाचे स्मरण केले. याप्रसंगी रघुवीर अहीर, राजु घरोटे, पुनम तिवारी, गौतम यादव, राहुल सूर्यवंशी व भाजप कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी श्रध्देय अटलजींच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून त्याच्या स्मृतिस नमन केले व अटलजींच्या जयंतीदिनी देशभरात साजरा होणाऱ्या सुशासन दिनाच्या अहीर यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

# आर.जी.एस.शाळेचे डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक परिक्षेत सुयश

## शाळेच्या ६ विद्यार्थ्यांची वरिष्ठ स्तरावर निवड

**हदगाव (प्रतिनिधी)**

हदगांव शहरातील नामांकित असलेल्या आर. जी. एस. स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत अव्वल कामगिरी करुन सुयश मिळविलेले आहे. या शाळेचे इयत्ता ६वी व ९ चे विद्यार्थी हदगांव हिमायत नगर वालुक्यात सर्व प्रथम आले असून जिल्हयात त्यांनी ४ था क्रमांक पटकिवली असून शाळेचे अनेक विद्यार्थी वरिष्ठ स्तरीय परिक्षेसाठी पा, ठरले असून अने विद्यार्थी प्रशस्ती पत्रास पात्र ठरल्याने सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या शाळा मधील इयत्ता ६ वी व ९ वी च्या वर्गामधील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचार आणि ज्ञान वाढविणे हे या परिक्षेचे प्रमुख वैशिष्टे आहे. मुंबई विज्ञान शिक्षक परिषदेमार्फत ही परिक्षा लेखी व प्रात्यक्षित व त्यानंतर मुलाखात अशा तीन स्तरावर घेण्यात येते. विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लावण्या बरोबरच देशाला हुशार बाल शास्त्रज्ञ विळावे असा या परिक्षेचा मुख्य हेतु आहे. नुकताच डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून आर.जी.एस. शाळेतील एकूण. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता, त्यातील ६ विद्यार्थ्यांची दुस-या स्तरासाठी निवड झाली असून ९ विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र मिळाले आहे. दुस-या स्तरावर निवड होणा-या विद्यार्थ्यांमध्ये १. रिया राजु मोरे (६२) २. समिक्षा हनमंतराव पिसाळ (६१) ३. अक्षया रवि पउळ (७१) ४) रिध्दी आशिष दरक (७०) ५) तेजल गोविंदराव वानखेडे (७०) हे विद्यार्थी दुस-या परिक्षेसाठी पात्र ठरले असून प्रशस्तीपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मयंक गजानन मेहत्रे, सोनाक्षी संदिप गुदाल, शिवाई संदिप सोनुले, नंदिनी बाळासाहेब कल्याणकर, अनन्या अविनाश गिरी, ऋतुराज मनोज मोरे व श्रेया दिनेश पउळ, हर्षद गोविंदराव कदम, अभिमन्यु दत्ता पवळे हया विद्यार्थ्यांचा समावेश आहे.हदगाव सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर. जी. एस. शाळेतील शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केल्याने विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाल्याने हदगांव शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण परसरले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी किशनराव फोले, शिक्षण विस्तार अधिकारी सुर्यकांत बाच्छे, गुणवंत काळे, केंद्रप्रमुख कर्जतकर सर, शाळेच्या संचालिका सौ. वंदना संदिप भुरे यांच्या सह सर्व शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले आहे.



कु.रिया मोरे



कु.समिक्षा पिसाळ



कु.अक्षया पउळ



कु.रिध्दी दरक



कु.तेजल वानखेडे



कु.कृष्णा जोशी

### आर.जी.एस.चे विद्यार्थी सर्व स्पर्धा गाजवतील-सौ.वंदना भुरे

**आर.जी.एस.शाळेचा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरुन अभ्यासक्रम असुन तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी विविध प्रकाशनाचा अभ्यासक्रम निवडला जातो. या शैक्षणिक अभ्यासक्रमा बरोबरच शाळेत ऑलिम्पीयाड, बी.डी.एस. होमी भाभा, नवोदय, स्कॉलरशिप तशा अनेक स्पर्धा परिक्षांची तयारी पालकांच्या मदतीने करुन घेतल्या जाते. त्यामुळे यापुढेही आमचे शिक्षक व पालकांच्या मदतीने आर.जी.एस.चे विद्यार्थी सर्व स्पर्धांत यशस्वी होवून शाळेचे नाव गाजवतील यात तिळमात्र शंका नसल्याचे मत शाळेच्या संचालिका सौ. वंदना संदिप भुरे यांनी व्यक्त केले.**